cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र वर्ष – ४ अंक–८३ शनिवार दि.१३ जुलै २०२४ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 • पाने– ६ किंमत ३ रूपये

## संपादकीय

### पुरूषी मानसीकतेला सर्वोच्च चपराक

सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या एका ऐतिहासिक निर्णयाने देशात सर्वांसाठीच समान नागरी कायदा आहे, यावर शिक्कामोर्तब केले. त्यामुळे कोणत्याही धर्ममार्तंडानी जर आपला कायदा हा वेगळा आणि तोच आमच्या धर्मियांना लागू पडतो, असे म्हटले तर त्या धर्म मार्तंडांची डाळ आता यापुढे शिजणार नाही. संपूर्ण देशात समान नागरी कायदा लागू होतो, तसेच या देशात केवळ धर्मनिरपेक्ष तत्त्वे असलेलाच कायदा चालेल, असेही न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

### केजरीवाल ईडी प्रकरणात सुटले, मात्र सीबीआय मध्ये अडकले

नवी दिल्लीः दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी अंतरिम जामीन मंजूर केला. दिल्ली मद्य धोरण घोटाळा ईडी प्रकरणात केजरीवलांना मोठा दिलासा मिळाला. मात्र सीबीआय तपास करत असलेल्या कथित अबकारी धोरण घोटाळ्याशी संबंधित भ्रष्टाचाराच्या प्रकरणात मात्र त्यांचा जामीनाचा निर्णय अद्याप प्रलंबित आहे. दिल्ली मद्य धोरण घोटाळा प्रकरणात शुक्रवारी (दि.१२ जुलै) राऊस एव्हेन्यू कोर्टात सीबीआय प्रकरणात सुनावणी झाली. यावेळी न्यायालयाने मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांची सीबीआय प्रकरणात न्यायालयीन कोठडी गुरूवार २५ जुलैपर्यंत वाढवली आहे.

# पीक नुकसानीच्या संकटात आधार मिळावा!

## शेतकऱ्यांनी पीकविमा उतरविण्याचे आयुक्तालयाचे आवाहन, शेवटचे तीन दिवस उरले

**पुणे । प्रतिनिधी**

**यंदा विमा अर्ज भरण्यासाठी १५ जुलैपर्यंत मुदत आहे. तर आतापर्यंत १ कोटी ४ लाख शेतकरी अर्ज आले आहेत. विमा भरण्याला आणखी ३ दिवस शिल्लक आहेत. त्यामुळे पीक नुकसानीच्या संकटात आधार मिळण्यासाठी शेतकऱ्यांनी लवकरात लवकर विमा अर्ज भरावेत, असे आवाहन कृषी आयुक्तालयाने केले आहे.**

केंद्र सरकारने विमा भरपाई देण्याच्या सुत्रात बदल केल्यामुळे शेतकऱ्यांना मागील खरिपात पीक नुकसानी पोटी ७ हजार ७४९ कोटी रुपये विमा भरपाई मंजूर झाला. यंदाही पीक विमा जास्तच गरजेचा होणार आहे. कारण ऑगस्टनंतर ला निना परिस्थिती सक्रीय होऊन चांगल्या पावसाचा अंदाज आहे. म्हणजेच खरिपातील पीकं काढणीच्या काळात यंदाही पावसाने नुकसान होण्याची शक्यता आहे. या परिस्थितीत शेतकऱ्यांना पीकविम्यातून भरपाई मिळेल. त्यासाठी पीकविमा योजनेत सहभाग घेणे गरजेचे आहे. केंद्र सरकारने मार्च महिन्यात विमा योनजेत भरपाई देण्याच्या सुत्रात महत्वाचा बदल केला. यामुळे शेतकऱ्यांना जास्त भरपाई मिळणार आहे. आधी अग्रीम भरपाई, स्थानिक नैसर्गिक आपत्ती, काढणी पश्चात नुकसान भरपाई पीक कापणी प्रयोगातून मिळणाऱ्या भरपाईतून वजा केले जायचे. यामुळे शेतकऱ्यांना ◀◀ पान २ वर




### विमा भरताना एक रूपयाच द्या...

*सध्या विमा योजनेचे अर्ज भरण्याचे काम सुरु आहे. १५ जुलै शेवटची तारिख आहे. आतापर्यंत राज्यातील शेतकऱ्यांचे १ कोटी ४ लाख अर्ज प्राप्त झाले आहेत. मागीलवर्षी राज्यातील शेतकऱ्यांनी १ कोटी ७० लाख अर्ज भरले होते. शेतकऱ्यांनी आपले पीक विमा संरक्षित करण्यासाठी तातडीने विमा अर्ज भरावा. तसेच विमा भरताना सीएससी केंद्रांना केवळ १ रुपयाच द्यावा. जादा पैशांची मागणी केल्यास कृषी विभागाकडे तक्रार करावी, असे आवाहन कृषी आयुक्तालयाने केले आहे.*

### सर्व प्रकारच्या नुकसानीवर भरपाई मिळते

*राज्य शासनाने मागील वर्षापासून शेतकऱ्यांसाठी एक रुपयात विमा सुरु केला. म्हणजेच शेतकऱ्यांचा विमा हप्ताही राज्य सरकार भरत आहे. पावसात मोठा खंड पडला आणि उत्पादकेतवर परिणाम झाला तर २५ टक्के अग्रीम भरपाई मिळते. अतिवृष्टी, गारपीट यामुळे पिकांचे नुकसान झाल्यास स्थानिक नैसर्गिक आपत्तीतून भरपाई मिळते. पिकाची काढणी करून वाळवण्यासाठी शेतात ठेवलेले असताना नुकसान झाल्यास काढणी पश्चात नुकसान भरपाई मिळते आणि शेवटी पीक कापणी प्रयोगावर आधारित भरपाई दिली जाते.*

### जगन मोहन रेड्डी यांच्यावर खुनाचा गुन्हा दाखल

हैद्राबादः आंध्र प्रदेशचे माजी मुख्यमंत्री जगन मोहन रेड्डी अडचणीत सापडले आहेत. त्यांच्यावर खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याच्याशिवाय इतर चार जणांवरही गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यात दोन आयपीएस अधिकाऱ्यांचा समावेश आहे. टीडीपीचे आमदार रघुराम कृष्ण राजू यांच्या तक्रारीवरून हा गुन्हा दाखल करण्यात आल्याचे पोलिस अधिकाऱ्यांनी शुक्रवारी सांगितले. रेड्डी यांच्याशिवाय आयपीएस अधिकारी पीव्ही सुनील कुमार, पीएसआर सीतारामजनायुलू, निवृत्त पोलीस अधिकारी आर विजय पॉल आणि गुंटूर जिल्हा रुग्णालयाचे अधीक्षक ◀◀ पान २ वर

# अखेर गुलाल लागला पण ३८ दिवसाने..!

## पंकजा मुंडे यांचा दिमाखदार विजय; वरळीपासून परळीपर्यंत जल्लोष



**बीड । प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीतील पराभव, त्यानंतर लोकसभा निवडणुकीतही पराभव झाल्यानंतर पंकजा मुंडे यांचे राजकारण कसे असेल अशी चर्चा सुरू होती. पंकजा मुंडे यांचे राजकारण संपलंय का? असेही दबक्या आवाजात म्हटले जात होते. पण भाजपने पंकजा मुंडे यांना विधान परिषदेचे तिकीट दिले. त्यामुळे पंकजा मुंडे पुन्हा राज्याच्या राजकारणात सक्रिय राहण्याचे संकेत मिळाले. लोकसभा निवडणुकीत गुलाल उधळण्याची कार्यकर्त्यांनी तयारी सुरु केली होती, मात्र शेवटच्या क्षणी बजरंग सोनवणे विजयी झाले. त्यानंतर ३८ दिवसाने लोकसभेचा नव्हे तर विधान परिषदेच्या विजयाचा कार्यकर्त्यांनी गुलाल उधळला. पंकजा मुंडे यांनी ◀◀ पान २ वर

### आईचा आशीर्वाद, डोळ्यात पाणी पंकजा मुंडेंच्या विजयानंतर प्रीतम मुंडे भावूक



*गेल्या ५ वर्षांपासून राजकीय अज्ञातवासात असलेल्या पंकजा मुंडेंचे अखेर राजकीय पुनर्वसन झाले आहे. तब्बल १० वर्षांनी पंकजा मुंडेंसाठी विजयाचा गुलाल उधळण्यात आला असून मुंडे कुटुंबीयांसाठी हा भावनिक क्षण आहे. त्यामुळेच, खासदारकीला पंकजा मुंडेंच्या पराभवानंतर दुःखी झालेल्या प्रीतम मुंडेंच्या डोळ्यात आज आनंदाश्रू पाहायला मिळाले. पंकजा मुंडेंच्या विजयाचा मुंडे कुटुंबीयांना अत्यानंद झाला असून संपूर्ण मुंडे फॅमिली विधानसभा परिसरात एकत्र आले होते. या विजयानंतर माजी खासदार आणि पंकजा यांच्या बहीण प्रीतम मुंडे यांनी प्रतिक्रिया देताना आज सर्वात मोठा आनंद झाल्याचे म्हटले. यावेळी, प्रीतम मुंडेंच्या डोळ्यात पाणी पाहायला मिळाले.*

### धाकधूक वाढली

पंकजा मुंडे यांना पहिल्या पसंतीच्या मतमोजणीत आधी एक, नंतर ६, नंतर ७ आणि १० मते मिळाली. संथगतीने पंकजा मुंडे यांची मते वाढत असल्याने धाकधूक वाढली होती. त्यामुळे पंकजा मुंडे समर्थक चिंतेत आले. पण पंकजा मुंडे यांनी मतांचा आवश्यक कोटा पूर्ण करून विजय मिळवताच सर्वांचे चेहरे खुलले.

### परळीत फटाक्यांची आतषबाजी

परळी येथील यशश्री निवासस्थानी मुंडे समर्थकांनी जल्लोष केला. परळीतील पंकजा मुंडे यांच्या यशश्री निवासस्थानी कार्यकर्त्यांचा उत्साह दिसून येतोय. गुलाल आणि फटाक्याची आतिषबाजी करत मुंडे समर्थक आनंद व्यक्त करत आहेत.

# विधान परिषदेत महायुतीचा आघाडीला धक्का

## शेकापचे जयंत पाटील यांचा पराभव; नार्वेकरांनी बाजी मारली



**मुंबई । प्रतिनिधी**

**विधान परिषदेच्या निवडणुकीत महायुतीचे सर्व ९ उमेदवार विजयी झाले असून या निवडणुकीत महाविकास आघाडीला मोठा धक्का बसला आहे. यात शरद पवार गटाच्या पाठींब्यावर उभे असलेल्या भाई जयंत पाटील यांचा पराभव झाला असून मिलिंद नार्वेकर यांचा शेवटच्या क्षणी विजय झाला आहे. त्यामुळे देवेंद्र फडणवीस यांचे या निवडणुकीच्या निकालात वर्चस्व दिसून आले आहे.**

महाराष्ट्रातील सध्याच्या घडीला सर्वात महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या विधान परिषद निवडणुकीत भाजपचे पाच उमेदवार विजयी झाले असून अजित पवार गटाचे दोन आणि शिंदे गटाचे दोन असे महायुतीचे ९ उमेदवार विजयी झाले आहेत.

भाजपच्या पंकजा मुंडे, राजेश टिळेकर, परिणय फुके, अमित गोरखे, सदाभाऊ खोत यांना प्रत्येकी २६ मते पडली असून अजित पवार गटाचे राजेश विटेकर ◀◀ पान २ वर

**भाजपचे विजयी उमेदवार**

१) पंकजा मुंडे २६ मते
२) परिणय फुके २३ मते
३) सदाभाऊ खोत २६ मते
४) अमित गोरखे २३ मते
५) योगेश टिळेकर २३ मते

**अजित पवार गटाचे विजयी उमेदवार**

१) शिवाजीराव गर्जे २३ मते,
२) राजेश विटेकर २४ मते

**काँग्रेसच्या विजयी उमेदवार**

१) प्रज्ञा सातव २५ मते

**शिवसेना ठाकरे गट**

१) मिलिंद नार्वेकर २४ मते

**शिवसेना (शिंदे) विजयी उमेदवार**

१) कृपाल तुमाने २५ मते
२) भावना गवळी २४ मते

**पराभूत उमेदवार**

शरद पवार गट पुरस्कृत उमेदवार
१) जयंत पाटील (शेकाप) १२ मते

# जरांगे पाटलांची आज संभाजीनगरमध्ये शांतता रॅली

## शाळा, महाविद्यालयांना सुट्टी

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

**मराठा आरक्षण नेते मनोज जरांगे यांची शांतता संवाद रॅली शनिवारी (दि.१३) रोजी संभाजीनगरमध्ये पार पडणार आहे. यामुळे होणारी गर्दी लक्षात घेता शहरातील सर्व शाळा व महाविद्यालयांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. याबाबतचे आदेश जिल्हा प्रशासनाकडून शिक्षण विभागास देण्यात आले होते. त्यानुसार शिक्षण विभाग व डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने सदर सुट्टी जाहीर केली आहे.**



गेल्या ६ जुलै पासून मराठवाड्यातील जिल्ह्यात जरांगे पाटील यांच्याकडून मराठा शांतता संवाद रॅली काढण्यात आल्या. दि.११ रोजी बीडमध्ये पाटलांची अभूतपुर्व अशी रॅली झाली. त्यानंतर ही रॅली आता संभाजीनगरमध्ये काढण्यात येत आहे. या पार्श्वभुमीवर संभाजीनगर मधील शाळा, महाविद्यालयांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. या निर्णयामुळे जवळपास ६०० शाळा व ५० महाविद्यालये बंद राहणार आहेत. रॅलीसाठी विविध ठिकाणाहून लोक येणार आहेत. त्यासाठी संपूर्ण जालना रोड बंद राहणार आहे. यामुळे वाहतूक व्यवस्थेत देखील बदल करण्यात आला असून, याचा फटका शाळकरी मुलांना बसू नये. यासाठी सदर सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. तसेच विद्यापीठाची १३ जुलै रोजी होणारी टीचर्स ईलिजीबिलीटी टेस्ट ◀◀ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.१२ जुलै २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : ६.५० क्विंटल | २,२९० | २,२९० | २,२९० |
| ज्वारी/हायब्रिड :२४.५० क्विंटल | २,२५० | २,४०० | २,३०६ |
| मूग : १.०० क्विंटल | १,९५० | ३,०४१ | २,४५५ |
| तूर : ११.५० क्विंटल | ८,००० | १०,७०१ | ९,८०० |
| उडीद : १.५० क्विंटल | ७,०५१ | ७,०५१ | ७,०५१ |
| बाजरीः २१.०० क्विंटल | २,०५० | २,८०० | २,५३८ |
| चिंच/लोकलः २०.०० क्विंटल | १,१०० | ३,५५० | २,३२५ |
| सोयाबीनः १६२.५० क्विंटल | ४,४५० | ४,५०० | ४,४७८ |
| हरभराः २.०० क्विंटल | ६,१५१ | ६,१५१ | ६,१५१ |

# उद्धव ठाकरे वाघासारखे लढले, विधानसभेला त्यांच्या प्रचारासाठी महाराष्ट्रात येणारच– ममता बॅनर्जी



**मुंबई । प्रतिनिधी**

उद्धव ठाकरे यांचा पक्ष आणि चिन्ह हिसकावला गेला, ते अनैतिक होते. तरीही उद्धव ठाकरे वाघासारखे लढले ही गोष्ट मला आवडली. मी आता विधानसभा निवडणुकीत त्यांच्या प्रचारासाठी महाराष्ट्रात येईन, असे वक्तव्य तृणमूल काँग्रेसच्या सर्वेसर्वा आणि पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी केले. ममता बॅनर्जी शुक्रवारी मुंबईत आल्या होत्या. यावेळी त्यांनी मातोश्रीवर जाऊन उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. यावेळी झालेल्या पत्रकार परिषदेत ममता बॅनर्जी यांनी सद्य राजकीय परिस्थितीवर भाष्य केले. ◀◀ पान २ वर

# गुन्हेगारीत महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर

## कायदा सुव्यवस्था राखण्यास सरकार अपयशी, विरोधी पक्षनेते अंबादास दानवेंची सरकारवर परखड टीका

**मुंबई । प्रतिनिधी**

**देशात एकूण ३५ लाख ६१ हजार ३७९ गुन्हे दाखल झाले असून, त्यातील ३ लाख ७४ हजार ३८ गुन्हे एकट्या महाराष्ट्रात नोंदविले गेले आहेत. हा दर १०.२ % इतका असून महाराष्ट्र देशात गुन्हेगारीत क्रमांक दोनवर आहे.**

देशात स्त्री अत्याचाराचे ४ लाख ४५ हजार गुन्हे दाखल झाले असून, ४५ हजार गुन्हे एकट्या महाराष्ट्रात दाखल आहेत. ॲसिड हल्ले, सायबर गुन्हे यात महिलांचे प्रमाण अधिक आहेत. एकीकडे सरकारने लाडकी बहीण योजना आणली मात्र प्रत्यक्षात महिलांचे संरक्षण करण्यास सरकार अपयशी ठरल्याचा आरोप दानवे यांनी केला मुख्यमंत्री यांचा बुलडोझर फक्त काही भागात चालत असून ते कामापेक्षा शोबाजी करत असून राज्यात कायदा व सुव्यवस्था राखण्यास हे सरकार पूर्णपणे अपयशी ठरल्याची परखड टीका विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केली. हे सरकार मोठं मोठ्या घोषणा ◀◀ पान २ वर

# २५ जून हा 'संविधान हत्या दिवस' म्हणून पाळणार !

## भाजपाची काँग्रेसवर कुरघोडी, केंद्र सरकारकडून गॅझेटही जारी

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

केंद्र सरकारने दरवर्षी २५ जून हा दिवस 'संविधान हत्या दिवस' म्हणून पाळण्याचा निर्णय घेतला आहे. हा दिवस १९७५ च्या आणीबाणीतील अमानुष वेदना ◀◀ पान २ वर




### राजपत्रातील अधिसूचनेत हे केले नमूद

केंद्रीय गृह मंत्रालयाने शुक्रवारी जारी केलेल्या राजपत्रातील अधिसूचनेमध्ये असे नमूद केले आहे की, भारतातील लोकांचा संविधानावर आणि त्याच्या लवचिक लोकशाहीच्या सामर्थ्यावर अढळ विश्वास आहे. म्हणून, आणीबाणीच्या काळात सत्तेच्या घोर दुरुपयोगाला बळी पडलेल्या आणि लढा देणाऱ्या सर्वांना श्रद्धांजली वाहण्यासाठी आणि भारतातील जनतेला अशा कोणत्याही प्रकारे समर्थन न करण्याचे वचन देण्यासाठी भारत सरकार २५ जून हा दिवस 'संविधान हत्या दिवस' म्हणून घोषित करते. असे गॅझेटमध्ये सांगण्यात आले.

### हा तर नरेंद्र मोदी यांचा ढोंगीपणा–काँग्रेस

२५ जून हा दिवस 'संविधान हत्ये दिवस' म्हणून घोषित करण्याच्या सरकारच्या कृतीचा काँग्रेसने निषेध केला आणि पंतप्रधान नरेंद्र मोदींनी याला आणखी एक "ढोंगीपणाची कवायत" अशी टीका केली. काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश म्हणाले, "भारतीय जनतेने त्यांना निर्णायक व्यक्तिमत्व सोपवण्याआधी दहा वर्षे अघोषित आणीबाणी लादलेल्या गैर–जैविक पंतप्रधानांच्या दांभिकतेचा आणखी एक नमुना. ४ जून २०२४ रोजी राजकीय आणि नैतिक पराभव जो इतिहासात मोदीमुक्ती दिवस म्हणून नोंदवला जाईल. "हे एक गैर–जैविक पंतप्रधान आहेत ज्यांनी भारतीय राज्यघटना आणि त्याची तत्त्वे, मूल्ये आणि संस्थांवर पद्धतशीर आक्रमण केले आहे, अशी टीका रमेश यांनी केली.

cmyk

## अग्रलेख

# पुरूषी मानसीकतेला सर्वोच्च चपराक

सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या एका ऐतिहासिक निर्णयाने देशात सर्वांसाठीच समान नागरी कायदा आहे, यावर शिक्कामोर्तब केले. त्यामुळे कोणत्याही धर्ममार्तंडानी जर आपला कायदा हा वेगळा आणि तोच आमच्या धर्मियांना लागू पडतो, असे म्हटले तर त्या धर्म मार्तंडांची डाळ आता यापुढे शिजणार नाही. संपूर्ण देशात समान नागरी कायदा लागू होतो, तसेच या देशात केवळ धर्मनिरपेक्ष तत्त्वे असलेलाच कायदा चालेल, असेही न्यायालयाने स्पष्ट केले आहे. यामुळे सर्वोच्च न्यायालयाचा बुधवारचा निवाडा हा केवळ एका मुस्लीम महिलेसाठी महत्त्वाचा नसून या देशातील तमाम कोट्यावधी मुस्लीम महिलांना भारतीय नागरी कायद्याचा अधिकार प्राप्त होतो, यावर शिक्कामोर्तब करणारा आहे.

.घटस्फोटीत महिलांना मुस्लीम महिला फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १२५ अंतर्गत त्यांच्या पतीकडून त्या पोटगीची मागणी करू शकतात. त्याचबरोबर तिला देखभालीसाठीचा भत्ता मिळविण्याचाही पूर्ण अधिकार आहे, असेही न्यायालयाने नमूद केलेले आहे. याचा अर्थ देशात केवळ धर्मनिरपेक्ष कायदाच सर्वांना लागू आहे, यावरही शिक्कामोर्तब होते. अशा परिस्थितीमध्ये मुस्लीम धर्मातील काही नेतेमंडळी मुस्लीम नागरिकांना केवळ स्वत:चा धार्मिक कायदा लागू होतो, असे निवेदन करून सरकारला आव्हान देणाऱ्यांना सर्वोच्च न्यायालयाच्या बुधवारच्या निवाड्याने जोरदार प्रत्युत्तर मिळालेले आहे. तेलंगणातील एका मुस्लीम महिलेने तिच्या पतीने तिला तलाक दिल्यानंतर आपल्या मुलांच्या संगोपनासाठी आणि स्वत:च्या देखभालीसाठी पतीने आपल्याला पोटगी द्यावी, अशी याचना करून तेलंगणा उच्च न्यायालयात याचिका सादर केली होती. तेलंगणा उच्च न्यायालयाने सहा महिन्यांपूर्वी त्यावर निवाडा देताना अब्दुल समद या व्यक्तीला असा आदेश दिला होता की त्यांनी आपल्या पत्नीच्या देखभालीसाठी पोटगी द्यावी. या अनपेक्षित निवाड्यामुळे समद याने या आदेशाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. घटस्फोटीत मुस्लीम महिलेला फौजदारी प्रक्रिया संहिता १९७४ नुसार कलम १२५ अन्वये याचिका दाखल करण्याचा अधिकार नाही आणि सदर महिलेला मुस्लीम महिला कायदा १९८६ मधील तरतुदींचे पालन करावे लागेल असा युक्तिवाद केला होता. यावर वारंवार सुनावणी झाली होती. न्यायमूर्ती बी. बी. नागरचना आणि न्यायमूर्ती ऑगस्टीन जॉर्ज मसीह यांनी समद याची याचिका फेटाळून लावली आणि भारतीय मुस्लीम महिलांना देखील पोटगी मिळवण्याचा पूर्ण अधिकार असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने नमूद केले. या ऐतिहासिक निवाड्यामुळे लोकशाहीप्रधान जगातील सर्वात मोठ्या देशातील मुस्लीम महिलांना आता इतरांप्रमाणेच नैसर्गिक न्याय प्राप्त होईल. हा मुस्लीम महिलांसाठी फार मोठा ऐतिहासिक निवाडा आहे. छोट्या छोट्या कारणास्तव महिलांना तलाख देऊ पाहणाऱ्या व्यक्तींना यानंतर सहजपणे जबाबदारीतून मुक्त होता येणार नाही, तर आपल्या पत्नीच्या पालनाची जबाबदारी देखील त्याला उचलावी लागणार आहे. गेल्या कित्येक वर्षात दुर्लक्षित घटक ठरलेल्या मुस्लीम महिलांसाठी हा एक ऐतिहासिक निवाडा ठरावा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेला हा सर्वोच्च निवाडा असून त्यामुळे मुस्लीम महिलांना देखील स्वतंत्रपणे जगण्याचा अधिकार प्राप्त होतो. कित्येक गरीब मुस्लीम महिलांना त्यांच्या नवऱ्याने दिलेल्या तलाक आणि त्यानंतर अत्यंत वाईट अवस्थेला तोंड द्यावे लागते. मुलांचे पालनपोषण देखील करण्याची जबाबदारी संबंधित महिलेवर येत असते आणि तिच्याकडे उत्पन्नाचे कोणतेही साधनही नसते. अशा या अबलांना कोणी मदत करायची? समाजदेखील त्याकडे साफ दुर्लक्ष करीत असतो. त्यामुळेच सर्वोच्च न्यायालयाचा बुधवारी दिलेला निवाडा हा ऐतिहासिक आणि मुस्लीम महिलांसाठी त्यांच्या अधिकारावर शिक्कामोर्तब करणारा आहे. यापूर्वी शाहबानो प्रकरणातही सर्वोच्च न्यायालयाने मुस्लीम महिलांना न्याय प्राप्त करून दिला होता. फौजदारी प्रक्रिया संहिता १९७४ अंतर्गत कलम १२५ ही धर्मनिरपेक्ष तरतूद आहे आणि ती मुस्लीम महिलांनाही लागू होते. मात्र राजीव गांधी हे पंतप्रधान असताना मुस्लीमांनी सर्वोच्च न्यायालयाच्या निवाड्यास जोरदार विरोध केला. निदर्शने केली, मोर्चे काढले, आंदोलन उभारले. त्यामुळे मुस्लीम महिला कायदा १९८६ रद्द करण्यात आला, मात्र २००१ मध्ये या कायद्याची वैधता कायम ठेवण्यात आली. हैदराबाद उच्च न्यायालयामध्ये जेव्हा हे प्रकरण सुनावणीस आले होते, त्यावेळी न्यायालयाने देखील सदर महिलेला पोटगी देण्यात यावी, असा निवाडा दिला होता. मुस्लीम महिला घटस्फोट अधिकार संरक्षण कायदा १९८६ मुळे घटस्फोटीत महिला फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १२५ अंतर्गत पोटगी घेऊ शकत नाही, असा युक्तीवादच सर्वोच्च न्यायालयात केला होता. मात्र न्यायमूर्तीनी हा युक्तिवादच पूर्ण फेटाळून लावला आणि मुस्लीम महिलांनादेखील कायद्यानुसार समान पोटगी मिळवण्याचा अधिकार आहे, असा सर्वोच्च निवाडा सर्वोच्च न्यायालयाने आता दिला. सर्वोच्च न्यायालयाचा हा निवाडा मुस्लीम महिलांसाठी एक विजयाचा दिवस आहे असे म्हणण्यास हरकत नाही कारण न्यायालयाने निवाडा देताना काही टिप्पणी देखील केली आहे ती देखील तेवढीच महत्त्वाची आहे. न्यायमूर्तींनी म्हटलेले आहे की पोटगी देणे हा प्रकार धर्मादाय नसून तो विवाहित महिलांचा मूलभूत अधिकार आहे. सर्व विवाहित महिलांसाठी लैंगिक समानता आणि आर्थिक सुरक्षिततेच्या तत्त्वाला बळकटी देणारा अधिकार आहे, असे नमूद केले आहे. त्याही पलीकडे जाऊन सर्वोच्च न्यायालयाने जो सल्ला जवळपास सर्वच पुऊषांना दिलेला आहे तो म्हणजे आता भारतीय पुरूषाने स्वत:चे घरसंसार चालविण्यात गृहिणींची भूमिका आणि त्यांचा त्याग केवढा महत्त्वाचा आहे हे समजून घेण्याची वेळ आलेली आहे.

# पंकजाताई मुंडेंचा दणदणीत विजय ; परळीसह जिल्ह्यात आनंदोत्सव

**विधानभवन परिसर, प्रदेश कार्यालयासमोर कार्यकर्त्यांचा जल्लोष ; ढोल ताशांचा निनाद, गुलालांची उधळण, फटाक्यांची आतिषबाजी ; विजयाच्या घोषणांनी परिसर दणाणला**







**मुंबई । प्रतिनिधी**

भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांनी आज विधानपरिषद निवडणूकीत पहिल्या पसंतीची मते घेऊन दणदणीत विजय संपादन केला. या विजयानंतर परळीसह जिल्ह्यात अक्षरशः आनंदोत्सव साजरा झाला. विधानभवन परिसर आणि भाजप प्रदेश कार्यालया समोर कार्यकर्त्यांनी गुलालाची उधळण, फटाक्यांची आतिषबाजी करत दिवाळी साजरी केली. कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड मोठा उत्साह यावेळी पहावयास मिळाला. विधानपरिषदेच्या अकरा जागांसाठी आज मतदान झाले. सायंकाळी निकाल जाहीर झाला, यात पंकजाताई मुंडे पहिल्या पसंतीची मते घेऊन विजयी झाल्या, विजयासाठी २३ मतांचा कोटा असताना त्यांना २६ मते मिळाली. विजयानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांनी त्यांचं अभिनंदन केलं.

### कार्यकर्त्यांचा जल्लोष ; विधानभवन परिसर गुलालाने न्हाऊन निघाला

पंकजाताई मुंडे यांच्या आजच्या विजयाकडे सर्वांचेच लक्ष लागले होते. विजय जाहीर होताच राज्यभरातून आलेल्या कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष केला. विधानभवन परिसर अक्षरशः गुलालाने न्हाऊन निघाला तर विजयाच्या जोरदार घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. भाजपच्या प्रदेश कार्यालयासमोर पंकजाताईंचे स्वागत करण्यासाठी कार्यकर्ते मोठया संख्येने जमले होते, पंकजाताईंनी याठिकाणी जाऊन सर्वांचे स्वागत स्वीकारले, यावेळी ढोल ताशांचा निनादात कार्यकर्ते आनंदाने बेभान झाले होते. दरम्यान, परळी शहरात राणी लक्ष्मीबाई टॉवर, छत्रपती शिवाजी महाराज चौक तसेच पंकजाताईंच्या यशःश्री निवासस्थानी कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतिषबाजी केली तसेच गुलाल उधळून एकच जल्लोष केला. जिल्ह्यात बीड, आष्टी, पाटोदा, शिरूर, केज, अंबाजोगाई आदींसह विविध ठिकाणी कार्यकर्त्यांनी वाजतगाजत पेढे वाटून आनंद व्यक्त केला.

# अखेर पंकजा मुंडे आमदार बनल्या, १० वर्षांनी उधळला विजयाचा गुलाल

**मुंबई। प्रतिनिधी**

वडील आणि दिवंगत गोपीनाथ मुंडेंचा बालेकिल्ला असलेल्या परळी मतदारसंघात २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत पंकजा मुंडेंचापराभव झाला. या पराभवानंतर विजयाचा गुलाल उधळण्यासाठी माजी मंत्री पकंजा मुंडेंना तब्बल ५ वर्षांची वाट पाहावी लागली. तत्पूर्वी, २०१४ विधानसभा निवडणुकीत पंकजा मुंडेंनी परळी मतदारसंघातून धनंजय मुंडेंचा तब्बल २४ हजार मतांनी पराभव करत मोठा विजय मिळवला होता. त्याचवेळी, गावकी-भावकीप्रमाणे अत्यंत चुरशीच्या झालेल्या निवडणुकीत कार्यकर्त्यांसह पंकजा मुंडेंनी आनंदोत्सव साजरा करत विजयाचा गुलाल उधळला. मात्र, त्या गुलालानंतर संसदीय राजकारणातील विजयाचा गुलाल उधळण्यासाठी तब्बल १० वर्षांची वाट पाहावी लागली. त्यात, २०१९ च्या पराभवानंतर जवळपास ५ वर्षांचा राजकीय वनवासच त्यांच्या नशिबी आला होता. त्यामुळे, आता विधानपरिषद निवडणुकीच्या निमित्ताने १० वर्षानंतर पंकजा मुंडेंनी कुटुंबीयांसह विजयाचा गुलाल उधळला.

विधानपरिषद निवडणुकींचा निकाल हाती आला असून भाजप नेत्या पंकजा मुंडेचा विजय झाला आहे. पंकजा यांच्या विजयाचा आनंदोत्सव साजरा करण्यासाठी त्यांचं कुटुंब विधानभवनात दाखल झाल्याचे पाहायला मिळाले. विधानपरिषद निवडणुकीत पंकजा मुंडेंना २६ मतं मिळाली आहेत. त्यामुळे, या विजयानंतर पकंजा मुंडेंच्या समर्थकांनी जल्लोष केला असून विधिमंडळ परिसरात मुंडे कुटुंबीयही आनंदी असल्याचं दिसून आले. बीड जिल्हा हा भाजप नेते गोपीनाथ मुंडेंचा बालेकिल्ला राहिला आहे, अगदी सायकलवर फिरुन प्रचार करण्यापासून गोपीनाथ मुंडेंनी बीड जिल्ह्यात कमळ खुलवले. परळी मतदारसंघातून ते राज्याच्या विधानसभेत पोहोचले. राज्याचे उपमुख्यमंत्रीपदही त्यांनी भूषवले. मात्र, २००९ साली गोपीनाथ मुंडे बीड मतदारसंघातून लोकसभेवर निवडून गेले, त्यामुळे त्यांच्या विधानसभा मतदारसंघातून त्यांची कन्या पंकजा मुंडेंना उमेदवारी देण्यात आली. त्यामुळे, नाराज झालेल्या पुतण्या धनंजय मुंडेंची नाराजी दूर करण्यासाठी त्यांना विधानपरिषदेवर संधी दिली. मात्र, मुंडे कुटुंबातील भावकीच्या सुप्त संघर्षाला येथूनच सुरुवात झाली. या संघर्षातूनच धनंजय मुंडेंनी २०१३ साली राष्ट्रवादीत प्रवेश केला. त्यानंतर, २०१४ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत परळीमधून पंकजा मुंडे विरुद्ध धनंजय मुंडे अशी लढत झाली, त्यामध्ये पंकजा यांनी २४ हजार मतांनी बाजी मारली.

### २०१४ नंतर भाजपातील सुप्त संघर्ष

राज्यात २०१४ भाजप महायुतीचे सरकार आल्यामुळे भाजप आमदार पंकजा मुंडेंना मंत्रीपदाची संधी मिळाली. राज्याचे ग्रामविकामंत्रीपद त्यांनी भूषवलं, दुर्दैवाने मे २०१४ मध्ये गोपीनाथ मुंडेंचे अपघाती निधन झाले. त्यामुळे, बीडमधील राजकारण हे पंकजा मुंडेंभोवती फिरू लागलं. तर, गोपीनाथ मुंडेंच्या राजकीय वारसदार बनून त्या राज्याच्या राजकारणात पुढेही आल्या. दरम्यान, याच काळात भाजपमधील त्यांच्या वागण्या-बोलण्याची, त्यांच्या राजकीय महत्त्वाकांक्षांची राजकीय वर्तुळात नेहमीच चर्चा होऊ लागली. त्यातच, मी जनतेच्या मनातील मुख्यमंत्री असल्याचे विधान त्यांनी केले होते. त्यांच्या या विधानामुळे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पंकजा मुंडे यांच्यात सुप्त संघर्ष सुरू झाल्याचे बोलले जायचे. त्यातच, २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत धनंजय मुंडेंकडून पंकजा मुंडेंचा पराभव झाला. यावेळी, भाजपच्याच काही नेत्यांनी धनंजय मुंडेंना ताकद दिल्याचीही चर्चा राजकीय वर्तुळात सातत्याने झाली.

### २०१९ नंतर राजकीय संघर्ष नशिबी

पंकजा मुंडेंचा २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत भाऊ धनंजय मुंडे यांच्याकडून पराभव झाला. या पराभवानंतर पंकजा यांचे राजकीय पुनर्वसन केलं जाईल, अशी चर्चा राजकीय वर्तुळात होती, आणि मुंडे समर्थकांना अपेक्षाही होती. मात्र, त्यांचे राजकीय पुनर्वसन केवळ चर्चेतच राहिले. भाजपकडून अनेक नवख्या चेहऱ्यांना आमदारकी मिळाली. मात्र, पंकजा मुंडेंना वेट अँड वॉच करावे लागले. विधानपरिषदेनंतर राज्यसभेसाठीही भाजपच्या काही नेत्यांची नावे चर्चेत आली. त्यावेळीही, पंकजा मुंडेंचे नाव पुढे आले. मात्र, पंकजा मुंडेंच्या पदरी त्यावेळीही निराशाच आली. विशेष म्हणजे गोपीनाथ मुडेंचे समर्थक असलेल्या भागवत कराड यांना राज्यसभेवर घेऊन केंद्रीयमंत्री बसवण्यात आले. पण, पंकजा मुंडेंना पुन्हा वेटिंगवरच ठेवण्यात आलं. त्यातच, २०२४ च्या लोकसभा निवडणुकांची घोषणा झाली आणि भाजपकडून पंकजा मुंडेंना तिकीट देऊन त्यांचे पुनर्वसन करण्याचा प्रयत्न झाला. मात्र, मराठा आरक्षणाचा मुद्दा आणि बीडमधील सामाजिक असमतोलतेचा फटका बसल्याने त्यांचा पराभव झाला. त्यामुळे, विजयाच्या गुलाल पंकजा मुंडेंपासून आणखी दूर केला होता. पण, भाजपने विधानपरिषद निवडणुकीत पंकजा मुंडेंना यंदा संधी दिली. २०२४ च्या ११ जागांवरील विधानपरिषद निवडणुकीसाठी भाजपने ५ नावे जाहीर केली, त्यात पंकजा मुंडेंना संधी मिळाली अन्? पंकजा मुंडेंचा राजकीय वनवास संपुष्टात आला. पंकजा मुंडेंनी संसदीय राजकारणात नोव्हेंबर २०१४ नंतर जुलै २०२४ मध्ये विजयाचा गुलाल उधळला आहे. पंकजा यांच्या या विजयामुळे मुंडें समर्थकांनीही आंनदोत्सव साजरा केला.

### धनंजय मुंडे अन्? पंकजांमधील राजकीय संघर्ष

भाजपचे ज्येष्ठ नेते गोपीनाथ मुंडे यांच्या निधनानंतर धनंजय विरुद्ध पंकजा असा राजकीय संघर्ष सुरू झाला. २०१४ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत परळीमधून पंकजा मुंडे विरुद्ध धनंजय मुंडे अशी लढत झाली, त्यामध्ये पंकजांनी बाजी मारली. मात्र, या विजयानंतर पंकजांना विजयासाचा गुलाल उधळण्यासाठी मोठी वाट पाहावी लागली. गोपीनाथ मुंडेंच्या निधनानंतर डिसेंबर २०१६ मध्ये परळी नगरपालिकेची निवडणूक झाली. मुंडे कुटुंबीयांसाठी ही नगरपालिका नेहमीच महत्त्वाची ठरली आहे. यावेळेस पंकजा विरुद्ध धनंजय असं पुन्हा चित्र होतं. तेव्हा धनंजय मुंडे यांनी ३३ पैकी तब्बल २७ उमेदवार निवडून आणत त्यांनी नगरपालिकेवर आपलं वर्चस्व सिद्ध केलं. या निवडणुकीनंतर भावा-बहिणीतली चुरस वाढली. २०१७च्या सुरुवातीला लगेचच झालेल्या जिल्हा परिषद निवडणुकीत राष्ट्रवादीने पुन्हा सर्वाधिक जागा मिळवल्या तर भाजप दुसऱ्या क्रमांकावर होती. या जिल्हा परिषद निवडणुकीतच परळी तालुक्यामध्ये भाजपला मोठा फटका बसला. मे २०१७ मध्ये परळी कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूक लागली. १८ जागांसाठी ४२ उमेदवार रिंगणात होते. अनेक वर्षं गोपीनाथ मुंडे यांच्या ताब्यात बाजार समिती होती. या बाजार समितीच्या निवडणुकीत पंकजा आणि धनंजय पुन्हा एकदा समोरासमोर उभे होते. दोघांनी आपापल्या दिवंगत वडिलांच्या नावांवर पॅनल उभे केले होते. त्यावेळी पंकजा यांच्या बहीण खासदार डॉ. प्रीतम मुंडे यांनी प्रचार केला होता.

## पान १वरून...

### पीक नुकसानीच्या संकटात

कमी भरपाई मिळायची. पण आता केंद्राने एकून संरक्षित रकमेतून प्रत्येक टप्प्यावर मिळणारी भरपाई वजा केली जाईल, असा नियम केला आहे. पीक विमा योनजेत आणखी एक बदल म्हणजे, यापुढे पीक विमा भरपाई केंद्र शासनाच्या विमा पोर्टलद्वारे आधार संलग्न बँक खात्यामध्ये करण्यात येणार आहे. त्यामुळे विमा अर्ज भरताना आता आधार संलग्न बँक खातेच द्यावे. तसेच विम्याचा अर्ज आधार कार्डवरील नावाप्रमाणेच भरला जाईल, याची काळजी घ्यावी. पण अजूनही काही नियम बदलण्याची आवश्यकता आहे. याची मागणी शेतकऱ्यांसह सर्वच जण केंद्राकडे करत आहेत. राज्य कृषी विभागानेही पीक विमा योनजेत काही बदल करण्याची शिफारस केंद्राकडे केली आहे. कारण पीकविमा योजना केंद्राच्या नियमानुसार चालते. त्यामुळे योजनेत बदल केंद्र सरकारच करू शकते. मागच्या वर्षी शेतकऱ्यांना विक्रमी ७ हजार १४९ कोटी रुपये विमा भरपाई मिळाली. यापैकी ४ हजार कोटी रुपये शेतकऱ्यांना देण्यात आले. उरलेले लवकरच मिळणार आहेत. यंदाही शेतकऱ्यांसाठी पीकविमा खूपच गरजेचा आहे. कारण यंदा चांगल्या पावसाचा अंदाज हवामान विभागाने दिला. त्यातच ऑगस्टनंतर ला निना परिस्थितीमुळे चांगला पावसाचा अंदाज आहे. म्हणजेच आपली खरिपातील पीकं काढणीच्या काळातच पाऊस वाढण्याची शक्यता आहे. या काळात आपली मूग, उडीद, सोयाबीन, मका, कापूस पिकाची काढणी सुरु होते. त्यामुळे या पिकांचे नुकसान होऊ शकते. नुकसान झाल्यास विमा भरपाई मिळून आपल्याला आर्थिक आधार मिळेल. त्यासाठी विमा अर्ज भरावा लागेल.

------------

### अखेर गुलाल लागला

विजयासाठी आवश्यक कोट्यापेक्षा जास्त मते घेऊन म्हणजे २६ मते घेऊन विजय मिळवला आहे. पंकजा मुंडे विजयी झाल्याने वरळीपासून परळीपर्यंत जल्लोष करण्यात येत आहे. पंकजा मुंडे या विधान परिषदेवर निवडून आल्याने त्या मंत्री होणार का? अशी चर्चाही आता सुरू झाली आहे. विधान परिषदेच्या ११ जागांसाठी शुक्रवारी मतदान झाले. १२ उमेदवार रिंगणात असल्याने विधान परिषदेची निवडणूक अत्यंत चुरशीची झाली होती. या निवडणुकीत काय होणार? अशी चर्चा होती. खासकरून सतत पराभवाचा सामना करावा लागणाऱ्या पंकजा मुंडे यांचे काय होणार? अशी चर्चा सुरू होती. संध्याकाळी पावणे सहाच्या दरम्यान मतमोजणीला सुरुवात झाली. पंकजा मुंडे यांनी विजयासाठी निर्धारीत करण्यात आलेल्या कोट्यापेक्षा अधिक मते घेऊन विजय मिळवला आहे. विजयासाठी २३ मते आवश्यक होती. पण पंकजा मुंडे यांनी २६ मते मिळवली आहेत. त्यांनी तीन अतिरिक्त मते घेतली आहेत. त्यामुळे अखेर पंकजा मुंडे यांचा संसदीय राजकारणात प्रवेश झाला आहे.

--------

### जरांगे पाटलांची आज

(टीईटी) देखील पुढे ढकलण्यात आली आहे. आता सदर परीक्षा रविवारी व सोमवारी (दि.१४ व १५ जुलै) विद्यापीठ परिसरात सकाळी १०.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत ऑनलाईन पध्दतीने लेखी परीक्षा घेण्यात येईल. विद्यापीठ ग्रंथालय, व्यवस्थापन शास्त्र विभाग व संगणकशास्त्र विभागात रविवार व सोमवार या दोन दिवशी चाचणी घेण्यात येईल. अधिक माहिती संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येणार असल्याची माहिती कुलसचिव डॉ.प्रशांत अमृतकर यांनी दिली.

-----------

### विधान परिषदेत महायुतीचा

व शिवाजीराव गर्जे या दोघांनाही २३ मते पडल्याने ते ते विजयी झाले. शिंदे शिवसेनेच्या भावना गवळी आणि कृपाल तुमाने यांना २३ मते पडली असून त्यांचाही विजय झाला आहे. काँग्रेस उमेदवार प्रज्ञा सातव यांचा विजय झाला आहे. तर ठाकरे गटाचे उमेदवार मिलिंद नार्वेकर यांचाही शेवटच्या क्षणी विजय झाला. त्यांना पहिल्या पसंतीत २२ मते मिळाली होती. त्यानंतर दुसऱ्या पसंतीमध्ये त्यांना ३ मते जास्तीची पडल्याने २४ मते घेऊन ते विजयी झाले. शरद पवार गटाच्या पाठींब्यावर शेकापचे भाई जयंत पाटील यांचा मात्र या निवडणुकीत पराभव झाला आहे. त्यांना फक्त शरद पवार गटाचे १२ मते पडली.

**काँग्रेसची ७ मते फुटली**

या निवडणुकीत काँग्रेसचे ७ मते फुटल्याची माहिती समोर येत आहे. अजित पवार गटाकडे ४२ मते होती. पण अजित पवार गटाला ४७ मते मिळाली आहेत. त्यामुळे अजित पवारांनी काँग्रेसचे ५ तर भाजपने २ मते फोडली असल्याचे दिसते. त्यामुळे काँग्रेसचे ७ मते फुटली आहेत. तसेच एमआयएम आणि समाजवादी पक्षाची मतेही महायुतीला पडल्याचा अंदाज आहे.

**दुसऱ्या पसंतीच्या मतांवर दोघांचा विजय**

सदाभाऊ खोत यांना पहिल्या पसंतीत कमी मते पडली होती. मात्र ते दुसऱ्या पसंतीत २६ मते घेऊन विजयी झाले आहे. तर मिलिंद नार्वेकर यांना पहिल्या पसंतीत २२ मते पडली होती. त्यांना दुसऱ्या पसंतीत त्यांना ३ मते जास्तीची पडल्याने त्यांचा २४ मते घेऊन विजय झाले.

**दुसऱ्या पसंतीच्या मतांवर दोघांचा विजय**

सदाभाऊ खोत यांना पहिल्या पसंतीत कमी मते पडली होती. मात्र ते दुसऱ्या पसंतीत २६ मते घेऊन विजयी झाले आहे. तर मिलिंद नार्वेकर यांना पहिल्या पसंतीत २२ मते पडली होती. त्यांना दुसऱ्या पसंतीत त्यांना ३ मते जास्तीची पडल्याने त्यांचा २४ मते घेऊन विजय झाले.

**सर्वपक्षीय संबंध नार्वेकरांच्या कामी आले**

ठाकरे शिवसेनेकडे आवश्यक संख्याबळ नसताना मिलिंद नार्वेकर हे विधान परिषद निवडणुकीत विजयी झाले आहेत. सर्वपक्षीय संबंधामुळे त्यांचा विजय झाला असल्याचे म्हटले जात आहे.

----------

### गुन्हेगारीत महाराष्ट्र

सर्वसामान्यांसाठी नव्हे कंत्राटदारांच्या हितासाठी करते अशा शब्दांत दानवे यांनी टीका केली. २६० अनव्ये प्रस्तावावर बोलताना सरकारने केलेल्या विविध घोषणांवर सरकारवर त्यांनी निशाणा साधला. सरकार राज्याच्या विकासासाठी काम करत नसून स्वार्थ आणि भ्रष्टाचारासाठी काम करत असल्याचे दिसते. गृह विभाग हे विशिष्ट अधिकारी, कंत्राटदार यांच्यासाठी काम करते का की प्रस्ताव समोर ठेवून काम करते, असा सवाल दानवे यांनी उपस्थित केला. या विभागातील अधिकारी जनतेच्या पैशाचा अपव्यय करतात आणि राज्याला अधोगतीकडे नेण्याचं काम करतात अशा शब्दांत दानवे यांनी सरकारवर टीकास्त्र सोडले.

**भ्रष्ट अधिकाऱ्यांना संरक्षण का?**

समृद्धी महामार्गाच्या कामात राधेश्याम मोपलवार या अधिकाऱ्याला मुदतवाढ का दिली गेली? मूठभर लोकांच्या समृद्धीसाठी अलिबाग, सिंधुदुर्ग कॉरीडोअरचे काम हाती घेतले गेले. या रस्त्याच्या विकासाच्या नावाखाली भूसंपादन करून चढ्या दराने जमिनी विकायचा व्यवसाय सुरु झाला आहे. कॅगने संजय मुखर्जी यांच्यावर ठपका ठेवला असताना सिडको, एमएमआरडीए सारख्या ठिकाणी त्यांची नेमणूक का केली. हे अधिकारी सरकारी जावई असल्यासारखे वागत असून त्यांना मराठवाड्यात पोस्टिंग का देत नाही असा सवाल दानवे यांनी सभागृहात उपस्थित केला.

------------

### उद्धव ठाकरे वाघासारखे लढले,

मी नेहमी मुंबईत येते तेव्हा शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांना भेटते. आता मुकेश अंबानी यांनी मला निमंत्रित केले, म्हणून मी मुंबईत आले आहे, असे ममता बॅनर्जी यांनी सांगितले. केंद्रातील मोदी सरकार अस्थिर करण्यासाठी तुम्ही चंद्राबाबू नायडू किंवा नितीश कुमार यांच्या संपर्कात आहात का, असा प्रश्न ममता यांना विचारण्यात आला. त्यावर ममता बॅनर्जी यांनी केंद्र सरकारच्या विरोधात जाऊन मी काहीच करणार नाही, असे सांगितले. मी कोणाच्याही संपर्कात नाही, असे ममता बॅनर्जी यांनी म्हटले. यावेळी ममता बॅनर्जी यांना काँग्रेस आणि तुमच्यात सर्वकाही आलबेल नाही का, असा प्रश्न विचारण्यात आला. यावर ममता बॅनर्जी यांनी म्हटले की, पूर्वी काँग्रेसचे मुरली देवरा हे माझ्या ओळखीचे होते. मुंबईत आल्यावर मी त्यांना भेटायचे. पण आता मी मुंबईत कोणत्याही काँग्रेस नेत्याला ओळखत नाही. दिल्लीतील काँग्रेस नेत्यांना मी ओळखते. त्यामुळे मुंबईत मी काँग्रेस नेत्यांना भेटत नाही, असे ममता बॅनर्जी यांनी म्हटले.

---------

### भाजपाची काँग्रेसवर कुरघोडी

सहन करणाऱ्या सर्वांच्या मोठ्या योगदानाचे स्मरण होईल, असे गृहमंत्री अमित शहा यांनी १२ जुलै रोजी सांगितले. एक्स वरील सोशल मीडिया पोस्टमध्ये, अमित शाह म्हणाले की, दमनशाही सरकारच्या हातून अक्षम्य छळ सहन करूनही लोकशाही पुनरुज्जीवित करण्यासाठी संघर्ष करणाऱ्या लाखो लोकांच्या आत्म्याचा सन्मान करण्यासाठी हा दिवस साजरा करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला असल्याचे त्यांनी सांगितले. 'संविधान हत्या दिवस' साजरा केल्याने प्रत्येक भारतीयामध्ये व्यक्तिस्वातंत्र्याची चिरंतन ज्योत आणि आपल्या लोकशाहीच्या संरक्षणाची ज्योत तेवत ठेवण्यास मदत होईल, अशा प्रकारे काँग्रेससारख्या हुकूमशाही शक्तींना त्या भयावहतेची पुनरावृत्ती करण्यापासून रोखता येईल, असेही अमित शाह यांनी पुढे बोलताना सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, २५ जून हा दिवस 'संविधान हत्या दिवस' म्हणून पाळणे हे संविधान पायदळी तुडवताना काय घडले याची आठवण करून देईल. एक्स वर ते म्हणाले, ''आणीबाणीच्या अतिरेकांमुळे त्रस्त झालेल्या प्रत्येक व्यक्तीला श्रद्धांजली अर्पण करण्याचा हा दिवस आहे, काँग्रेसने भारतीय इतिहासाचा काळा टप्पा सुरू केला.

---------

### जगन मोहन रेड्डी यांच्यावर खुनाचा

राही जी प्रभावती यांच्या नावांचाही समावेश आहे. पोलीसांनी सांगितले की, आमदार रघुराम कृष्णम राजू यांनी महिनाभरापूर्वी मेलद्वारे एक तक्रार पाठवली होती. त्यात त्यांनी, सीआयडी कार्यालयात बेल्ट आणि काठीने मारहाण केल्याचा आरोप केला होता. यावर कायदेशीर अभिप्राय घेण्यात आला. यानंतर गुरुवारी सायंकाळी ७ वाजता माजी मुख्यमंत्री रेड्डी आणि इतरांवर गुन्हा दाखल करण्यात आला. गुंटूर जिल्ह्यातील नागरापलेम पोलिस ठाण्यात हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

शनिवार दि. १३ जुलै २०२४



## मराठा आरक्षण शांतता रॅलीसाठी बाजीराव चव्हाण यांच्याकडून अल्पोपहार व पाणी बॉटलची व्यवस्था

बीड । प्रतिनिधी

मराठा आरक्षणाचे संघर्षयोद्धे मनोज दादा जरांगे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मराठवाड्यामध्ये चालू असलेली शांतता व आरक्षण जनजागृती रॅली आज बीड मध्ये दाखल झाली असता बीड मधे रॅली साठी येणाऱ्या मराठा बांधवांची गैरसोय होऊ नये.यासाठी धर्मवीर प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष बाजीराव दादा चव्हाण यांनी बीड येथिल धर्मवीर प्रतिष्ठानच्या सहकाऱ्यांना सूचीत करुण रॅलीमध्ये येणाऱ्या मराठा बांधवांसाठी अल्पोपहार व पाणी बोटलची व्यवस्था करून दिली. यावेळी वीस हजार पाणी बॉटल व दहा ते पंधरा हजार मराठा बांधवांनी अल्पोपहारचा आस्वाद घेतला.अशी माहिती धर्मवीर प्रतिष्ठानच्या सहकार्यानी दिली.

आरोग्यसेवक या नावाने राज्यात प्रसिद्ध झालेले तथा मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, ओएसडी मंगेश चिवटे,बाजीराव चव्हाण हे सामाजिक क्षेत्रात अग्रेसर असून बीड येथील मराठा आरक्षण सभेच्या अनुषंगाने आरोग्य शिबीर, मोफत अन्नदान, पिण्याच्या पाण्याची केलेली सोय ही सामाजिक बांधिलकीतून केली. आपण समाजाचे काहीतरी देणेकरी लागतो, याच भावनेतून खारीचा वाटा उचलला अशी प्रतिक्रिया बाजीराव चव्हाण यांनी दिली.

# ग्रामीण भागात घरातील वातावरण नियंत्रित ठेवणारी माळवदाची घरे कालबाह्य होत चालली!

ज्योतिराम पाढंरपोटे । माजलगाव

माळवद या नावाने ओळखली जाणारी घरातील वातावरण नियंत्रीत ठेवण्याची पारंपरिक पद्धत होती.माळवद या शब्दाचा अर्थ घराचे छप्पर,गच्ची अथवा टेरेस असा विविधांगांनी समजून घेता येतो. वर्तमानात एकमजली घरांना छप्पर म्हणून सिमेंट-लोखंडाचे पत्रे वापरले जातात. पूर्वीच्या काळी घराला छपराच्या जागी मोठमोठे लाकडी ओंडके टाकले जात असत. त्यावर सागाच्या लाकडाच्या पट्ट्या लावल्या जात. लाकडाचे ओंडके आणि सागाच्या पट्ट्या यांची एकसंघ आणि अनेक स्तरांची रचना केली जाई. त्यानंतर त्यावर भरपूर पांढरी माती मोठा दाब देऊन टाकली जाई.या प्रकारच्या छपरांना माळवद असे म्हणत.

माळवद तयार करण्यामागे घरातील वातावरण नियंत्रीत राहावे हा उद्देश असे. माती आणि लाकूड, दोन्ही घटक उष्णतोरोधक असल्याकारणाने उष्णतेस अटकाव होई आणि माळवद असलेल्या घरातील वातावरण नियंत्रीत राही.त्यामुळे माळवदाखालील घरामध्ये वातावरण उन्हाळ्यात थंडगार तर हिवाळ्यात उबदार राहत असे.

माळवदाचा वरील भाग हा कमी खोलीच्या लहान हौदासारखा दिसत असे.घराच्या माथ्यावर चारी बाजूंनी फूट-दीड फूट उंचीच्या भिंती असत.त्यामध्ये पांढ-या मातीचा भरणा असे.लाकडी ओंडक्यांचे काही स्तर,त्यानंतर सागाच्या पट्ट्या आणि वर मातीचे आवरण याप्रकारचे तयार केलेल्या माळवदाची उंची काही फुटांची असे. त्यावरची मातीदेखील घट्ट असे.तसेच पांढरी माती पाणी धरून ठेवत नसल्यामुळे पावसाळ्यात माळवदातून पाणी खाली झिरपत नसे. माळवदावर साठलेले पाणी निघून जाण्याकरता पन्हाळी लावलेली असे.सध्याच्या काळात थंडाव्यासाठी फ्रीज आणि उबदार वातावरणासाठी हिटरचा वापर केला जातो.मात्र आपल्या पूर्वजांनी पारंपरिक ज्ञानातून विकसित केलेली माळवदासारखी उपयुक्त पद्धत बदलत्या जीवनशैलीच्या प्रवाहात लुप्त होण्याच्या मार्गावर आहे.पूर्वीच्या काळी माजलगाव तालुक्यातील मोगरा,डाके पिंप्री,उमरी बु,आनंदगाव,लोणगाव,पात्रुड, गंगामसला, केसापुरी, सादोळा, तालखेड, टाकरवण, किट्टीआडगाव, आबेगाव, बोरगाव, देपेगाव, मंजरथ, सांडस चिंचोली, रोषणपुरी, शुक्ल तिर्थ लीमगाव,सोन्नाथडी, गुंजथडी, सुरुमगाव यांसारख्या गावात घरांना माळवद असे.आजही या परिसरातील काही जुन्या घरांवर माळवद आढळतात.सध्या सर्वच घरांच्या रचना आधुनिकतेकडे झुकत असताना दिसतात.त्यामुळे माळवद असलेली घरेदेखील लवकरच दिसेनाशी होतील'' पूर्वी बांधकामात सिमेंट वापरले जात नव्हतं. त्याला पर्याय होता पांढरी माती. ही माती चिवट असायची.उन, वारा,पाऊस, धरणीकंप यांचा तडाखा सोसून गेली तीनचारशे वर्षे झाली तरी पांढऱ्या मातीच्या भिंती, बुरुज,माळवद आजही सुस्थितीत आहेत.आत्ताच्या सिमेंटलाही मागे टाकेल अशी ही पांढरी चिवट माती यावर संशोधन व्हायला पाहिजे.








बदलत्या जीवनशैलीच्या प्रवाहात लुप्त होण्याच्या मार्गावर

## जागतीक युवा कौशल्य दिनानिमित्त शिवसंग्रामच्या वतीने भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

शिवसंग्रामचे संस्थापक अध्यक्ष लोकनेते स्वर्गीय विनायकराव मेटे साहेबानी नेहमीच समाज उपयोगी चळवळ राबवली,समाजातील अनेक सर्वसामान्यांना याचा फायदा देखील झाला यामध्ये त्यांनी नोकर भरती मेळावे घेतले यातून अनेक बेरोजगार तरुणांना रोजगार देखील उपलब्ध झाला. लोकनेते विनायकराव मेटे यांच्या वारसा कायम पुढे चालवत शिवसंग्रामच्या राष्ट्रीय अध्यक्षा डॉ.ज्योती विनायकराव मेटे यांनी भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन दि.. १५ जुलै सोमवार रोजी आशीर्वाद मंगल कार्यालय,बार्शी रोड, बीड येथे सकाळी ०९ ते सायं.०५ या वेळेत केले आहे.



यात ४० नामांकित कंपन्यांत ५ हजार नोकऱ्या उपलब्ध केल्या आहेत. तसेच या रोजगार मेळाव्यात तरुणांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन डॉ. ज्योती मेटे यांनी केले आहे.

ऊसतोड मजुरांचा जिल्हा अशी ओळख असलेल्या जिल्ह्यात मोठे उद्योग नसल्याने जिल्ह्यातील तरुण बेरोजगार आहेत. अश्यात वाढत चाललेली बेरोजगारी ही मोठी समस्या आहे. तरुणांकडे कौशल्य आहे परंतु त्यांच्या कौशल्याला वाव मिळावा यासाठी जिल्ह्यात एकही मोठा उद्योग नाही. परिणामी जिल्ह्यातील तरुण बेरोजगारीच्या छायेत आहेत. त्यांच्या हाताला काम मिळावे , रोजगार मिळावा ते स्वावलंबी व्हावेत यासाठी शिवसंग्रामच्या पुढाकाराने लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांच्या जयंतीनिमित्त आणि जागतिक युवा कौशल्य दिनाचे औचित्य साधून डॉ.ज्योती मेटे यांनी या मेळाव्याचे आयोजन केले आहे. यात ४० नामकित कंपन्यांत १० वी, १२ वी, आय. टी. आय, सर्व पदवीधर, इंजीनियरिंग, नर्सिंग इतयदीसाठी ५ हजार नोकऱ्या उपलब्ध असणार आहेत. या मेळाव्यासाठी उमेदवारांनी सकाळी ०९ ते ०५ या वेळेत मेळाव्याच्या ठिकाणी बायोडेटा, मार्कशीट, आधार कार्ड यासह आवश्यक कागदपत्रे सोबत ठेवावी तसेच ९५६१३३१२०१ या व्हाट्सअप क्रमंकावर नोकरी मोहत्सव असा मेसेज पाठवा असे आव्हान डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी केले आहे.

**रोजगार मेळाव्यात सहभागी होऊन तरुणांनी नोकऱ्यांची संधी मिळवावी – डॉ.ज्योती मेटे**

## ताईंच्या विजयामुळे जिल्ह्यातील कार्यकर्त्यांना ऊर्जा मिळेल –राजेंद्र मस्के





बीड । प्रतिनिधी

लोकनेत्या पंकजाताई मुंडे यांचा महाराष्ट्र विधानपरिषदेत झालेल्या विजयामुळे बीड जिल्हा भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते व सर्वसामान्य जनतेमध्ये समाधान व आनंद व्यक्त केला जात आहे. गेली पाच वर्षापासून जबाबदारीचे पद नसल्यामुळे जिल्हाच्या विकासाला न्याय देता आला नाही. पंकजाताई विधान परिषदेच्या आमदार झाल्यामुळे विकास कामाला पुन्हा एकदा गती मिळणार आहे. आजच्या विजयामुळे भाजपा कार्यकर्त्याला निश्चितपणे ऊर्जा मिळेल अशी प्रतिक्रिया भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी दिली असून, पंकजाताईंच्या विजयाचे स्वागत करून त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

भाजपा राष्ट्रीय सचिव लोकनेत्या पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांचा महाराष्ट्र विधान परिषद निवडणुकीत विजय झाला. आज या विजयाचा आनंदोत्सव संघर्षयोद्धा भाजपा कार्यालयासमोर कार्यकर्त्यांनी फटाके फोडून जल्लोष साजरा केला.

## रोहित ढवारे याने वाढदिवसानिमित मानव विकास मतिमंद विद्यालयातील विद्यार्थ्यांना केले शैक्षणिक साहित्याचे वाटप

अंबाजोगाई । प्रतिनिधी

जोधप्रसादजी मोदी विद्यालयाचा माजी विद्यार्थी रोहित ढवारे याने स्वतःच्या वाढदिवसानिमित्त मानव विकास मतिमंद विद्यालयातील विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्याचे वाटप केले. यावेळी संस्थेचे संस्थापक सचिव राजकिशोर मोदी ,आदित्य गोविंदवाड , शरद राठोड,रोहन जाधव,प्रमोद जाधव,ओमकार कासारे हे उपस्थित होते.

याप्रसंगी राजकिशोर मोदी यांनी फोटोग्राफर रोहित ढवारे याचे वाढदिवसा निमित्ताने अभिष्टचिंतन केले. आजकालचा युवक हा सामाजिक भान विसरून गैरमार्गाचा अवलंब करतांना दिसून येत आहे. मात्र त्याला रोहित हा अपवाद ठरला असल्याचे राजकिशोर मोदी यांनी याप्रसंगी सांगितले. आजच्या युवकांत केस वाढविणे, व्यसनाच्या आहारी जाणे, थोरामोठ्यांचा अनादर करणे याचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर



वाढल्याचे दिसत आहे. मात्र अशाही परिस्थितीत रोहित ढवारे व त्याचे सहकारी हे समाजाभिमुख काम करत असल्याबद्दल राजकिशोर मोदी यांनी आनंद व्यक्त केला.

रोहित याने श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्याच जोधाप्रसादजी मोदी विद्यालयात आपले शिक्षण घेतले आहे . आपणास याच शैक्षणिक संस्थेने घडविले आहे तेव्हा आपण ही आपल्या परीने येथील विद्यार्थ्यांसाठी कोठेतरी खारीचा वाटा उचलला पाहिजे याच सामाजिक भावनेने इतर अनाठायी खर्च टाळून याच संस्थेच्या मानव विकास विद्यालयातील विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्य वाटप करण्याचा मानस करत साहित्याचे वाटप केले. याच कार्याचा आदर्श समाजातील इतरही युवक घेऊन समाजात आपले नाव उज्वल करतील अशी अपेक्षा याप्रसंगी मोदी यांनी व्यक्त केली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रोहित ढवारे याचे सहकारी सत्यम भन्साळी, सूरज साळवे , निलेश साळवे , युवराज लखेरा , साखरे जगदीश, सौरभ पांचाळ , ऋषिकेश कडबाने , दीपक जाधव, वैभव पांचाळ, मयूर शेळके यांनी सहकार्य केले. या कार्यक्रमास मानव विकास विद्यालयाचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तथा विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिल्हा परिषदेतल्या अभिलेख कक्षातील खरेदीमध्ये अति.सीईओ साळुंखे यांचे हात बरबटले

बीड । प्रतिनिधी

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव साळुंखे यांनी जि.प. बीड येथील सुसज्ज अभिलेख कक्ष स्थापन केले परंतु स्वतःच्या पदाचा दुरुपयोग करत अभिलेख कक्षातील साहित्याची दाम दुप्पट खरेदी कंत्राटदारासमवेत केली आहे. अभिलेख कक्षातील लोखंडी रॅक रुपये १२७०० रुपयाला एक नग खरेदी केली आहे. असे असंख्य रॅक खरेदी केली आहे परंतु तेच रॅक होलसेल दरात पाच ते सात हजार रूपयाला मिळतात मग दामदुप्पट खरेदी कशासाठी? खरेदीसाठी कोणता निधी वापरला? टेंडर प्रक्रिया कशी केली? हे दडवून ठेवले जात आहे.

जिल्हा परिषद बीड या ठिकाणी माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये प्रथम अर्ज दाखल करत अभिलेख कक्षाची माहिती मागवली होती परंतु जन माहिती अधिकारी तथा उप-अभियंता मिसाळ, कार्यालयीन अधीक्षक शिंदे, कॅशीयर रासवे हे संगणमताने अभिलेख कक्षातील खरेदीचा भ्रष्टाचार बाहेर निघू नाही म्हणून माहिती देण्यास टाळाटाळ करत आहेत तसेच अभिलेख कक्षास जो निधी खर्च झालेला आहे तो कोणत्या हेड खाली झाला आहे याचीही माहिती विचारली असता तेही सांगण्यास देण्यास टाळाटाळ करत आहेत.

मा.मुख्य सचिव महाराष्ट्र शासन मुंबई, विभागीय आयुक्त छत्रपती संभाजी नगर, व जिल्हाधिकारी बीड यांनी सदर प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत करावी दोषींवर कारवाई करावी तसेच संबधित कन्स्ट्रक्शन काळ्या यादीमध्ये टाकावे व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव साळुंखे यांची त्वरित बदली करावी अशी मागणी केली आहे.

**भ्रष्टाचार उघड होऊ नये यासाठी माहिती देण्यास बांधकाम विभागातील कर्मचाऱ्यांकडून टाळाटाळ – अजय सरवदे**

## आषाढी वारीसाठी विशेष रेल्वेगाड्या धावणार

परळी । प्रतिनिधी

लाडक्या विठुरायाच्या दर्शनासाठी पंढरपुर येथे आषाढी यात्रेनिमित्त महाराष्ट्राच्या प्रत्येक भागातुन व इतर राज्यातून लाखोंच्या संख्येने भाविक, वारकरी पंढरपूर यात्रेकरीता येत असतात. भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेऊन रेल्वे प्रशासनाद्वारे विशेष गाड्या चालविण्याचा निर्णय घेतला असून या सर्व रेल्वेगाड्या परळी मार्गे धावणार आहेत.





आषाढी यात्रेनिमित्त रेल्वेकडून गाडी क्र . ०७५१५ / ०७५१६ नागरसोल – पंढरपूर – नागरसोल या विशेष एक्सप्रेसच्या २ फेऱ्या होणार असून नागरसोल – पंढरपूर ही गाडी दि १६ रोजी नागरसोल रेल्वे स्थानकाहून संध्याकाळी ०७.०० वा निघणार आहे तर

गाडी क्र.०७५१६ पंढरपूर – नागरसोल ही विशेष एक्सप्रेस दि १७बरोजी पंढरपूर रेल्वे स्थानकाहून रात्री ११.५५ वा निघणार आहे. या गाडीस ४ स्लीपर, १४ जनरल २ गार्ड ब्रेक वॅन कुल २० कोच असतील असणार आहेत.दुसरी यात्रा विशेष गाडी क्र . ०७५०५ / ०७५०६ अकोला – पंढरपूर – अकोला एक्सप्रेस याच्या देखील दोन फेऱ्या होणार असून गाडी क्र. ०७५०५ अकोला – पंढरपूर ही विशेष एक्सप्रेस दि १६ रोजी अकोला रेल्वे स्थानकाहून सकाळी ११.०० वा निघणार आहेत तर गाडी क्र.०७५०६ पंढरपूर – अकोला विशेष एक्सप्रेस दि १७ रोजी पंढरपूर रेल्वे स्थानकाहून रात्री ०९.४० वा निघणार आहे.तिसरी यात्रा विशेष गाडी क्र . ०७५०१ /०७५०२ आदिलाबाद – पंढरपूर – आदिलाबाद आषाढी विशेष एक्सप्रेस धावणार असून

गाडी क्र. ०७५०१ आदिलाबाद– पंढरपूर विशेष एक्सप्रेस दि १६ रोजी आदिलाबाद रेल्वे स्थानकाहून सकाळी ०९.०० वा निघणार आहे तर गाडी क्र.०७५०२ पंढरपूर – आदिलाबाद विशेष एक्सप्रेस दि १७ रोजी पंढरपूर रेल्वे स्थानकाहून रात्री ०८.०० वा निघणार आहे. या सर्व गाड्या परळी मार्गे धावणार असून सदरील विशेष यात्रा रेल्वे एक्सप्रेस गाड्याचा लाभ आषाढी वारीच्या निमित्ताने पंढरपूर येथे जाणाऱ्या सर्व भाविक आणि श्रद्धाळू यांनी घेऊन आपला प्रवास सुखकर करण्याचे आवाहन रेल्वे प्रशासनाने केले आहे .

# परळीतील विशेष रेल्वे प्रकल्प व विस्तार शहराच्या बाहेरून करा

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील महत्त्वाचे शहर म्हणून परळी शहराची ओळख आहे, औष्णिक विद्युत निर्मिती केंद्र, सिमेंट कंपनी, बारा ज्योतिर्लिंगा पैकी एक अशी ओळख आहे. रेल्वेचा निजाम सरकारच्या काळा पासून उपयोग आहे व त्यामुळे मराठवाड्यासह जिल्ह्याचा व परळी शहराचा विकास देखील झाला आहे. विशेष रेल्वे प्रकल्पासाठी जमीन अधिग्रहण करण्यासाठी सूचना सूचना रेल्वे मंत्रालय केंद्र सरकारने दिली आहे. पण शहराच्या बाहेर जमीन अधिग्रहण करावी अशी मागणी जिल्हाधिकारी यांच्याकडे यांच्याकडे केली आहे. निवेदन देते प्रसंगी वंचित बहुजन आघाडीचे सहसचिव पुरुषोत्तम वीर, प्रसिद्धीप्रमुख बालाजी जगतकर,अड. डी. आर. गोरे, संपादक बालासाहेब जगतकर, राजेश सरवदे, ज्ञानेश्वर गीते, संतोष वावळे आधी उपस्थित होते.

परळी परभणी विशेष रेल्वे प्रकल्प व दुहेरीकरण ना साठी जमीन अधिग्रहण कार्यक्रम हाती घेतला आहे. केंद्र सरकारने अधिसूचना देखील जाहीर जाहीर केली आहे. रेल्वे ट्रॅक दुहेरीकरण व विस्तार यामुळे परळी शहरातील जवळपास पंधरा ते वीस हजार लोकांच्या राहत्या घराला बसणार आहे त्यामध्ये, मिलिंद नगर बरकत नगर, आझाद नगर, जुना रेल्वे स्टेशन पद्मावती गल्ली, भीमा नगर या भागातील नागरिकांना फटका बसणार आहे. त्यावर उपाय म्हणून जमीन अधिग्रहण कार्यक्रम धुरीकरण विस्तारीकरण शहराच्या बाहेरून करावे अशी मागणी वंचित बहुजन आघाडी बीड जिल्ह्याच्या वतीने करण्यात आली आहे. जमीन अधिग्रहण कार्यक्रमात ज्या लोकांची घरे पाडली जाणार आहेत त्यांच्या कुटुंबातील एका व्यक्तीला शासकीय सेवेत नोकरी घेणे व व ज्यांची घरे यामध्ये जात आहेत त्यांना बाजार भावापेक्षा चारपट मावेजा देण्यात यावा अशी देखील मागणी करण्यात आली आहे. तीस दिवसात आपल्या हरकती परळी यांच्याकडे नोंदवणे आवश्यक आहे. या जमीन अधिग्रहण कार्यक्रमामुळे अनेक लोकांचे संसार उघड्यावर येणार आहेत. त्यामुळे तात्काळ रेल्वे जमीन अधिग्रहण कार्यक्रम थांबवावा. पर्यायी कार्यक्रम म्हणून तो शहराच्या बाहेर घेऊन जावा अशी देखील मागणी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने जिल्हाधिकारी यांच्याकडे करण्यात येत आहे. अन्यथा लवकरच वंचित बहुजन आघाडीच्या वतीने केंद्र सरकारच्या विरोधात तीव्र स्वरूपात जनआंदोलन उभारण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे.





रेल्वेसाठी शहरातील जमीन अधिग्रहण तात्काळ थांबवा जिल्हाधिकाऱ्याकडे वंचित बहुजन आघाडीची मागणी

पान ६ वरून...

## आ. आजबे यांच्या

आष्टी पाटोदा शिरूर तालुक्यातील प्रमुख रस्ते मार्गासाठी १५ कोटी रुपये एवढा निधी मंजूर केला असून या मंजुरी

मध्ये पुढील रस्त्यांचा समावेश आहे १) अमरापूर – पाथर्डी – कडा शिराळ मिरजगाव रामा ५४ रस्ता मध्ये सुधारणा करणे ०४ कोटी रुपये, २) चिंचपूर इजडे- सुरुडी- दैठण – आष्टी ते रामा ५५ रस्ता मध्ये रुंदीकरणासह सुधारणा करणे ०१ कोटी ५० लक्ष रुपये. ३) जिल्हा सरहद्द ते लोणी – धानोरा – वृद्धेश्वर सुधारणा करणे ०५कोटी रुपये. ४) डोंगरगण ते देवी निमगाव रस्ता मध्ये सुधारणा करणे ०४ कोटी ५० लक्ष रुपये अशा एकूण १५ कोटी रुपये रस्ते विकास कामासाठी निधी मंजूर करण्यात आला आहे. या मंजुरी बद्दल राज्याचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित दादा पवार साहेब उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्रजी चव्हाण पालकमंत्री तथा कृषी मंत्री धनंजय मुंडे साहेब या सर्वांचे आभार व्यक्त करण्यात आले आहेत.

cmyk




# एक रुपयात पीक विमा, योजनेसाठी उरले शेवटचे ४ दिवस

## शेतकऱ्यांना प्रशासनाचे आवाहन



नांदेड : पंतप्रधान पीक विमा योजनेत राज्य शासनाने सुरू असलेल्या खरीप हंगामात केवळ १ रुपये भरुन पीक विम्याचा लाभ देण्याकरिता सर्वसमावेशक पीक विमा योजना राबविण्यास मान्यता दिली आहे. शेतकऱ्यांनी १५ जुलैपर्यंत नोंदणी करुन योजनेत सहभाग घ्यावा, असं आवाहन कृषी विभागानं केलं आहे. केंद्र शासनाकडून प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार खरीप हंगाम २०२३-२४ ते रब्बी हंगाम २०२५-२६ साठी 'सर्वसमावेशक पीक विमा योजना' राबविण्यास राज्य शासनाने २६ जून २०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार मान्यता दिली आहे. केवळ १ रुपयामध्ये शेतातील पिकाचा पीक विमा काढला जातो. केंद्र आणि राज्य सरकार मोठ्या प्रमाणात यासाठी आर्थिक तरतूद करते. त्यामुळे जिल्ह्यातील ज्या शेतकऱ्यांनी आपले पीक संरक्षित केले नसतील त्यांनी तातडीने पीक विमा योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

नांदेड जिल्ह्यामध्ये ४०० कोटीपेक्षा अधिक शेतकऱ्यांना लाभ : गेल्यावर्षीच्या तुलनेत कमी शेतकऱ्यांनी पीक विमा योजनेचा लाभ यावर्षी घेतला आहे. यावर्षी ९७ टक्के पाऊस आतापर्यंत आला असून पिके संरक्षित करणे आवश्यक आहे. गेल्यावर्षी पीक विमा योजनेमध्ये ११ लाख शेतकऱ्यांनी भाग घेतला होता. मात्र यावर्षी गुरूवार ११ जुलै पर्यंत ७ लाख ४५ हजार शेतकऱ्यांनीच पीक विमा योजनेचा लाभ घेतला आहे. या योजनेतून नांदेड जिल्ह्यामध्ये ४०० कोटीपेक्षा अधिक लाभ शेतकऱ्यांना झाला आहे. योजनेची प्रभावी अंमलबजावणी लक्षात घेता प्रत्येक गावागावात यासंदर्भात जनजागृती व्हावी. केवळ १ रुपयामध्ये सेवाकेंद्र, सेतूकेंद्र व बँकेत जाऊन प्रधानमंत्री पिक विमा योजनेचा लाभ घेता येतो. त्यामुळे शेतकऱ्यांनी तातडीने पीक विमा योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन नांदेड जिल्हा प्रशासनाने केले आहे.

**शेवटच्या तारखेची वाट बघू नका**

पीक विमा योजनेसाठी १५ जुलै शेवटची मुदत आहे. परंतू शेवटच्या तारखेला पीक विमा भरतांना पोर्टलवर येणाऱ्या अडचणी लक्षात घेता त्यापूर्वीच आपल्या सहभाग नोंदविणे आवश्यक आहे. या योजनेमध्ये वेळेला महत्त्व असते त्यामुळे मुदतवाढ दिली जाणार नाही, हे लक्षात घेऊन सर्व शेतकऱ्यांनी याबाबत तातडीने पीक विमा योजनेचा लाभ घ्यावा.

**योजनेची प्रमुख वैशिष्ट्ये**

सर्वसमावेशक पीक विमा योजना अधिसूचित केलेल्या क्षेत्रातील फक्त अधिसूचित पिकांसाठी तसेच ऐच्छिक आहे. खातेदाराच्या व्यतिरिक्त कुळाने किंवा भाडेपट्टीने शेती करणारे शेतकरीही या योजनेत भाग घेण्यास पात्र आहेत. या योजनेअंतर्गत सर्व पिकांसाठी ७० टक्के जोखिमस्तर निश्चित करण्यात आला आहे. या योजनेअंतर्गत वास्तवदर्शी दराने विमा हप्ता आकारण्यात येणार असून शेतकऱ्यांवरील विमा हप्त्याचा भार कमी करण्यासाठी शेतकऱ्यांनी भरावयाचा विमा हप्ता खरीप हंगामासाठी दोन टक्के, रब्बी हंगामासाठी १.५ टक्के आणि नगदी पिकांसाठी ५ टक्के असा मर्यादित ठेवण्यात आला आहे. तसेच, या योजनेत शेतकऱ्यांनी प्रति अर्ज केवळ १ रुपया भरुन पीक विमा पोर्टलवर नोंदणी करावयाची आहे. विमा हप्ता १ रुपया वजा जाता उर्वरीत फरक हा सर्वसाधारण विमा हप्ता अनुदान समजून राज्य शासनामार्फत देण्यात येईल. या योजनेत विमा कंपनी एका वर्षामध्ये जिल्हा समुहामध्ये एकूण जमा विमा हप्ता रक्कमेच्या ११० टक्क्यापर्यंतचे दायित्व स्वीकारेल. एका वर्षातील देय पीक विमा नुकसान भरपाईची रक्कम जमा विमा हप्ता रक्कमेच्या ११० टक्के पेक्षा जास्त असल्यास ११० टक्केपेक्षा जास्तीचा भार राज्य शासन स्वीकारेल आणि जर देय पीक विमा नुकसान भरपाईची रक्कम जिल्हा समुहामध्ये एकूण जमा विमा हप्ता रकमेपेक्षा कमी असेल तर विमा कंपनी विमा हप्ता रक्कमेच्या जास्तीत जास्त २० टक्के रक्कम स्वतःकडे ठेवेल आणि उर्वरीत विमा हप्ता राज्य शासनाला परत करेल.




### महत्वाच्या घटना

१६६० : पावनखिंड झुंजवणार्या वीर बाजीप्रभू देशपांडे यांनी शिवाजी महाराज विशाळगडावर पोहोचल्याच्या खुणेच्या तोफांचे आवाज ऐकल्यावर 'आता मी सुखाने मरतो' असे म्हणून प्राण सोडला.
१८३७ : राणी व्हिक्टोरिया बकिंगहॅम पॅलेसमध्ये राहायला गेली. तेव्हापासून ते इंग्लंडच्या राजाचे/राणीचे अधिकृत निवासस्थान बनले.
१८६३ : सक्तीच्या सैन्यभरती विरोधात न्यूयॉर्क शहरात दंगा झाला.
१८०३ : साली राजा राम मोहन राय आणि अलेक्झांडर डफ यांनी आपल्या पाच विद्यार्थ्यांसोबत स्कॉटिश चर्च महाविद्यालयाची स्थापना केली.
१९०५ : कलकत्ता येथील साप्ताहिक वर्तमानपत्र 'संजीवनी' मध्ये पहिल्यांदा विदेशी मालाचा बहिष्कार करा म्हणून प्रकाशित करण्यात आलं.
१९०८ : लोकमान्य टिळकांवर दुसर्या राजद्रोहाच्या खटल्याचे काम सुरु झाले.
१९०८ : ऑलिम्पिक स्पर्धांमध्ये स्त्रियांना भाग घेण्यास परवानगी.
१९२९ : जतिंद्रनाथ दास यांनी लाहोर तुरुंगात आपले आमरण उपोषण सुरू केले. या उपोषणातच त्यांचा मृत्यू झाला.
१९५५ : २८ वर्षीय रुथ एलीसला प्रियकराचा खून केल्याबद्दल फासावर चढविण्यात आले. हॉलो वे तुरूंगातली ही फाशी ग्रेट ब्रिटनमधली स्त्रीकैद्याची अखेरची फाशी ठरली.
१९७७ : रोहित्रावर वीज पडल्यामुळे न्यूयॉर्क शहरातील वीजपुरवठा दीर्घकाळ खंडित झाला.
१९८३ : श्रीलंकेत वांशिक हत्याकांड. ३,००० तामिळ व्यक्तींची हत्या. ४,००,००० हून अधिक तामिळींचे पलायन.
२००६ : ईराण देशांतील अणुबॉम्ब निर्माण प्रकरण संयुक्त राष्ट्राच्या सुरक्षा परिषदेकडे देण्यात आले.
२०११ : मुंबई शहरात झालेल्या ३ बॉम्बस्फोटात २६ जण ठार तर १३० जण जखमी झाले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८६३ : अँग्लो-इंडियन इजिप्तज्ञ, पुरातत्वशास्त्रज्ञ, मानववंशशास्त्रज्ञ, इतिहासकार आणि लोककलाकार तसचं, युनायटेड किंगडममधील पुरातत्व शाखेच्या प्राध्यापक मार्गारेट अलीस मुरे यांचा जन्मदिन.
१८९२ : केसरबाई केरकर जयपूर-अत्रौली घराण्याच्या शास्त्रीय गायिका (मृत्यू: १६ सप्टेंबर १९७७)
१९३० : माजी भारतीय क्रिकेटपटू व माजी भारतीय कसोटी क्रिकेट पंच स्वरूप किशन यांचा जन्मदिन.
१९४० : भारतीय विद्वान, कादंबरीकार, लघुकथा लेखक आणि इंग्रजी आणि हिंदी साहित्याच्या कवी सुनिता जैन यांचा जन्मदिन.
१९४२ : हॅरिसन फोर्ड अमेरिकन अभिनेता
१९४४ : रुबिक क्यूब चे निर्माते एरो रुबिक यांचा जन्म.
१९५३ : राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सन्मानित भारतीय तमिळ भाषिक कवी, गीतकार आणि कादंबरीकार वैरामुथू रामासामी यांचा जन्मदिन.
१९६४ : भारतीय क्रिकेट खेळाडू उत्पल चॅटर्जी यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६६० : पावनखिंड लढवून बाजीप्रभू देशपांडे यांनी स्वराज्यासाठी आपल्याल प्राणाचे बलिदान दिले.
१७९३ : फ्रेंच क्रांतिकारी ज्याँपॉल मरात यांचे निधन.
१९६९ : महर्षी न्यायरत्न धुंडिराजशास्त्री विनोद तत्त्वज्ञ, विचारवंत, योगी, स्वातंत्र्य सैनिक आणि लेखक. (जन्म: १२ जानेवारी १९०२)
१९६९ : बंगाली शिक्षणतज्ज्ञ, लेखक, तत्वज्ञानी आणि पूर्व पाकिस्तानचे भाषाशास्त्रज्ञ मुहम्मद शाहिदुल्ला यांचे निधन.
१९८० : बोत्स्वानाचे पहिले राष्ट्राध्यक्ष सेरेत्से खामा यांचे निधन.
१९९० : अर्देशिर फुर्दोरजी सोहराबजी ऊर्फ 'बॉबी' तल्यारखान क्रीडा समीक्षक व समालोचक (जन्म: ? ? १८९७)
१९९४ : पं. कृष्णा गुंडोपंत तथा 'के. जी.' गिंडे शास्त्रीय (धृपद) गायक, संगीतकार व शिक्षक (जन्म: २६ डिसेंबर १९२५)
१९९५ : ज्ञानपीठ पुरस्कार विजेता भारतीय बंगाली भाषिक कादंबरीकार आणि कवी आशापूर्ण देवी यांचे निधन.
१९९५ : भारतीय पत्रकार आणि स्तंभलेखक तसचं, सुप्रसिद्ध भारतीय चित्रपट मसिक लेखिका देवयानी चौबाल यांचे निधन.
२००० : इंदिरा संत साहित्य अकादमी पुरस्कार विजेत्या कवयित्री व लेखिका (जन्म: ४ जानेवारी १९१४)
२००९ : निळू फुले संगीत नाटक अकादमी पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय हिंदी मराठी चित्रपट अभिनेते (जन्म: ? ? १९३०)
२०१० : मनोहारी सिंह भारतीय संगीत दिग्दर्शक, सैक्सोफोनिस्ट आणि चित्रपट संगीतकार तसचं, गीतकार आर. डी. बर्मन यांचे मुख्य संयोजक (जन्म: ८ मार्च १९३१)

# कारले लागवड करण्यासाठी उपयुक्त वाण

कारले हे वेलवर्गीय पीक आहे. साधारण १०० ते १२० दिवसात पीक निघते. कारल्यामध्ये नर व मादी फुले वेगवेगळी परंतु एकाच झाडावर लागतात. स्थानिक बाजारपेठेत पांढऱ्या रंगाची तर निर्यातीसाठी हिरव्या रंगाची कारलेला भरपूर मागणी असते.

मार्केट मधील टॉप कारले बियाणे : अ) विद्यापीठाच्या जाती - १) हिरकणी -फळे गडद हिरव्या रंगाची, १५ ते २० सेंमी. लांब व काटेरी असतात. सरासरी उत्पादन १३० क्विंटल प्रति हेक्टर एवढे मिळते. २) फुले ग्रीन गोल्ड -फळे गडद हिरव्या रंगाची, २५ ते ३० सेंमी. लांब व काटेरी असतात. हेक्टरी २३० क्विंटल उत्पादन मिळते. ३) फुले प्रियांका - या संकरित जातींची फळे गर्द हिरवी, २० सेमी.

लांब व भरपूर काटेरी असतात. ही जात खरीप व उन्हाळी लागवडीस योग्य आहे. ही जात केवडा या रोगास बळी पडत नाही. सरासरी उत्पादन २०० क्विंटल प्रति हेक्टरी आहे. ४) कोकण तारा - फळे हिरवी, काटेरी व १५ सेमी. लांबीची असतात. फळे दोन्ही टोकाला निमुळती व मध्यभागी फुगीर असतात. निर्यातीसाठी अशी फळे योग्य असतात. सरासरी उत्पादन १५ ते २० टन प्रति हेक्टर आहे. कोकण विभागात या जातीच्या लागवडीची शिफारस आहे.

ब) खाजगी कंपनीचे बियाणे : १) महिको व्हाईट लाँग - लागवडीपासून ७५ ते ७८ दिवसात पीक काढणीस तयार होते. फळाचा रंग पांढरा, साल मध्यम जाड व भरपूर शिरा असून फळांची लांबी ९ ते १२ इंच असते. २) महिको ग्रीन लाँग - फळांचा रंग गडद हिरवा व टोकाकडे फिकट असून इतर वैशिष्ट्ये महिको व्हाईट लाँग प्रमाणेच आहेत. ३) एमबीटीएच. १०१ - ५० ते ५५ दिवसात पीक तयार होते. फळाचे सरासरी वजन ६५ ते ७० ग्रॅम असून फळांची लांबी १८ ते २० सें.मी. असते. फळे गडद हिरव्या रंगाची, चांगल्या शिरा असलेली जात आहे. एकरी १० ते १२ टन उत्पादन मिळते. ४) एमबीटीएच १०२ - ५५ ते ६० दिवसात पीक तयार होते. फळाचे सरासरी वजन १०० ते १२० ग्रॅम भरते. फळांचा रंग पांढरा असून फळे ३० ते ३५ सें.मी. लांब व बारीक असतात. एकरी १२ ते १४ टन उत्पादन मिळते.



# राष्ट्रीय गोपाल रत्न पुरस्काराद्वारा पशुधनास ५ लाखापर्यंतचे बक्षीस!




दूध उत्पादक शेतकरी, दुग्ध सहकारी संस्था/एमपीसी/एफपीओ आणि कृत्रिम रेतन तंत्रज्ञान यांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने दरवर्षी राष्ट्रीय गोकुळ मिशन अंतर्गत, २०२१ पासून राष्ट्रीय गोपाल रत्न पुरस्कारा प्रदान करत आहे. मत्स्य व्यवसाय, पशुसंवर्धन आणि दुग्ध व्यवसाय मंत्रालयाच्या, अंतर्गत पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय विभाग, शेतकऱ्यांना शाश्वत उपजीविका प्रदान करण्यासाठी पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय क्षेत्राच्या प्रभावी विकासासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत आहेत. भारतातील देशी गोवंशाच्या जाती मजबूत आहेत आणि राष्ट्रीय अर्थव्यवस्थेत महत्त्वपूर्ण भूमिका बजावण्याची अनुवांशिक क्षमता त्यांच्याकडे आहे. स्थानिक गोवंश जातींचे वैज्ञानिक पद्धतीने संवर्धन आणि विकास करण्याच्या उद्देशाने डिसेंबर २०१४ मध्ये 'राष्ट्रीय गोकुळ मिशन' सुरू करण्यात आले.

पुरस्कारांसाठी श्रेणी : देशी गायी/म्हशींच्या जातींचे संगोपन करणारे सर्वोत्तम दूध उत्पादक शेतकरी. सर्वोत्कृष्ट दुग्ध सहकारी संस्था. दूध उत्पादक कंपनी. शेतकरी उत्पादक संघटना. सर्वोत्कृष्ट कृत्रिम रेतन तंत्रज्ञ. या वर्षापासून, विभागाने ईशान्य क्षेत्रातील राज्यांसाठी विशेष पुरस्कार समाविष्ट केला आहे जेणेकरुन ईशान्य प्रदेशातील दुग्ध विकास उपक्रमांना प्रोत्साहन आणि चालना मिळेल.

पुरस्कार तपशील व स्वरूप : राष्ट्रीय गोपाल रत्न पुरस्कार (२०२४) वर नमूद केल्याप्रमाणे प्रत्येक श्रेणीतील ईशान्य क्षेत्र राज्यांसाठी १ ला, २ रा, ३ रा आणि एक विशेष पुरस्कार प्रदान करेल. राष्ट्रीय गोपाल रत्न पुरस्कार २०२४ मध्ये गुणवत्तेचे प्रमाणपत्र, स्मृती चिन्ह आणि पहिल्या दोन श्रेणींमध्ये उदा. सर्वोत्कृष्ट दुग्ध उत्पादक शेतकरी आणि सर्वोत्कृष्ट /ऊ्रड/त्र्झ्रज/ चझ्रऊ यांचा समावेश असेल.

पुरस्काराची रक्कम : पहिला क्रमांक : ५ पाच लाख रुपये. दुसरा क्रमांक : ३ लाख रुपये. तृतीय क्रमांक : २ लाख रुपये. ईशान्य क्षेत्रासाठी विशेष पुरस्कार : २ दोन लाख रुपये.

सर्वोत्कृष्ट कृत्रिम रेतन तंत्रज्ञ श्रेणीच्या बाबतीत, राष्ट्रीय गोपाल रत्न पुरस्कार-२०२४ मध्ये गुणवत्तेचे प्रमाणपत्र आणि केवळ स्मृति चिन्ह असेल. कृत्रिम रेतन तंत्रज्ञ श्रेणीमध्ये कोणतेही रोख बक्षीस दिले जाणार नाही.

अर्ज कुठे कराल? : २०२४ वर्षात राष्ट्रीय गोपाल रत्न पुरस्कारासाठी नामांकन राष्ट्रीय पुरस्कार पोर्टल द्वारे ऑनलाइन दाखल केले जातील. १५ जुलै २०२४ पासून नामांकन सुरू होईल आणि नामांकन सादर करण्याची अंतिम तारीख ३१ ऑगस्ट २०२४ असेल. पात्रता आणि ऑनलाइन अर्ज करण्याच्या मार्गदर्शक तत्त्वांबद्दल अधिक तपशीलांसाठी संकेतस्थळाला भेट देता येईल. राष्ट्रीय दूध दिनानिमित्त २६ नोव्हेंबर २०२४ रोजी हे पुरस्कार प्रदान केले जाणार आहेत.

# जनावरांच्या आरोग्यासाठी खरारा आवश्यक



पशू व्यवस्थापनामध्ये खरारा (ग्रूमिंग) हा एक महत्त्वाचा भाग आहे. खरारा केल्याने जनावरांचे आरोग्य चांगले राहाते. त्यांच्या मानसिकतेवर चांगला परिणाम होतो. नियमित खरारा, कातडीची देखभाल, खुरांची काळजी आणि बाह्य परजीवींचे व्यवस्थापन महत्त्वाचे आहे. यातील प्रत्येक पद्धती ही आजाराचा प्रसार रोखण्यासाठी महत्त्वाची आहे. यामुळे जनावरे शारीरिकदृष्ट्या मजबूत आणि उत्पादन सक्षम राखण्यास मदत होते. बंदिस्त गोठे हे रोगप्रसारक आणि परजीवींच्या उत्पतीचे कारण आहे. त्यामुळे नियमित आणि वारंवार खरारा आवश्यक ठरतो.

खरारा केल्याने नियमित त्वचेची स्थिती, जखमा किंवा आजाराची चिन्हे लवकर शोधण्यात मदत होते. त्वरित उपचार करता येतात. संसर्गाचा धोका कमी करते. रक्ताभिसरण आणि त्वचेच्या आरोग्याला चालना मिळते, खरारा करताना पशू आणि मालकामध्ये परस्परसंवाद होतो. यामुळे तणावाची पातळी कमी होऊन जनावरे शांत आणि निश्चल होतात. सातत्यपूर्ण संवादांद्वारे पालकांचे पशूंसोबतचे नाते अधिक दृढ होते. त्यामुळे जनावरांची हाताळणी आणि तपासणी प्रक्रिया सुलभ घडते. आरोग्य सेवा, आजार नियंत्रण आणि पशूंच्या वर्तणुकीशी संवर्धन यांचे एकत्रीकरण म्हणून खरारा महत्त्वाचा आहे.

जनावरांमध्ये परजीवींचा प्रादुर्भाव रोखणे हे जनावराचे आरोग्य योग्य राखण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. परजीवी म्हणजे जंत आणि बाह्य कीटक जसे की गोचीड, गोमाशी, पिसवा आणि उवा यांचा समावेश होतो. परजीवींच्या प्रादुर्भावामुळे जनावर अस्वस्थ राहते. कुपोषण, अशक्तपणा आणि आजाराच्या समस्या दिसतात. रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत होते. हे लक्षात घेऊन परजीवी निर्मूलन, जंतनाशकांचा वापर आवश्यक आहे. याचबरोबरीने खरारा करणे हा प्रतिबंधात्मक उपाय महत्त्वाचा आहे. बाह्य परजीवींचा त्रास कमी होतो. याचबरोबरीने गोठ्यांची स्वच्छता करणे महत्त्वाचे ठरते. दाट केस किंवा लोकरीमध्ये वाढणारे जीव तयार होण्यापासून रोखण्यासाठी लोकर कातरणे आवश्यक ठरते. परजीवी प्रादुर्भाव रोखण्यासाठी चराई क्षेत्र व्यवस्थापन महत्त्वाचे आहे. चराईच्या क्षेत्र बदलामुळे मातीत जन्मलेल्या परजीवींचा भार कमी होतो, ज्यामुळे जनावरे चरताना प्रादुर्भावाचा धोका कमी होतो. स्वच्छ पाणी आणि योग्य स्वच्छता सुनिश्चित केल्याने परजीवींचा प्रसार रोखता येतो. परजीवी समस्या लवकर शोधण्यासाठी आणि उपचारांसाठी निरीक्षण आवश्यक आहे. नियमित विष्ठा तपासणीअंतर्गत परजीवी ओळखण्यात मदत होते. शारीरिक तपासणीमुळे बाह्य कीटकांचा प्रादुर्भाव लक्षात येतो. त्यांचा प्रसार होण्यापासून आणि कळपाच्या किंवा कळपाच्या एकूण आरोग्यावर होणाऱ्या दुष्परिणाम रोखण्यात मदत होते.

खरारा करण्याचे फायदे : खरारा केल्यामुळे जनावरांच्या शरीरावरील परजीवी, घाण निघून जाते. संक्रमण नियंत्रणात येते. रक्ताभिसरण आणि त्वचेचे आरोग्य सुधारते, कातडी चमकदार होते. त्वचा आजारांचे नियंत्रण होते. रोगजनकांचा मानव आणि इतर प्रजातींमध्ये प्रसार रोखता येतो. खरारा केल्याने संपूर्ण त्वचेमध्ये नैसर्गिक तेल प्रसारित होण्यास मदत होते, ज्यामुळे चमक आणि गुणवत्ता सुधारते. विशेषत: लांब केस असलेल्या प्राण्यांमध्ये केसांचा गुंता टाळता येतो. मेंढ्या आणि ससा यांच्या विशिष्ट जाती लोकर किंवा फरसाठी वाढविल्या जातात. त्यांच्यामध्ये खरारा केल्यामुळे गुणवत्ता चांगली राहते. जाड कातडी असलेल्या जनावरांमध्ये उष्णतेच्या ताणापासून बचाव करण्यासाठी खरारा महत्त्वाचा आहे. जास्तीचे केस काढून टाकून किंवा मेंढ्यांमध्ये जाड लोकरीची कापणी महत्त्वाची ठरते. शरीराचे तापमान अधिक प्रभावीपणे नियंत्रित करण्यात मदत होते, त्यामुळे उष्ण हवामानात उष्णतेशी संबंधित आजारांचा धोका कमी होतो.

## राज्यात अजूनही काही भाग कोरडाच; शेतकऱ्यांत चिंतेचे वातावरण

पुणे : राज्यात काही ठिकाणी मुसळधार पाऊस बरसत आहे तर काही जिल्हे अजूनही जोरदार पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. जुलै महिना सुरू होऊन १० दिवसांपेक्षा जास्त कालावधी झालेला आहे तरी अजूनही समाधानकारक पाऊस पडलेला नाही त्यामुळे शेतकऱ्यांत चिंतेचे वातावरण आहे. दरम्यान, ज्येष्ठ निवृत्त हवामान तज्ज्ञ माणिकराव खुळे यांच्या हवामान अंदाजानुसार राज्यात पावसासाठी अनुकूल वातावरण असून येत्या काही दिवसात अनेक भागात पावसाची शक्यता आहे.

पावसासाठी सध्या राज्यात अजूनही अनुकूल परिस्थिती कायम आहे. शनिवार दि.१३ जुलै पर्यंत कोकणात अति जोरदार, विदर्भात जोरदार, तर खानदेश, नाशिक, नगर, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, जिल्ह्यात मध्यम ते जोरदार व मराठवाड्यातील जिल्ह्यात किरकोळ पावसाची शक्यता जाणवते. रविवार १४ जुलै पासून त्यापुढील ४ दिवस म्हणजे गुरूवार दि. १८ जुलैपर्यंत मराठवाड्यासहित संपूर्ण महाराष्ट्रात सध्याच्या पावसापेक्षा अधिक पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. विशेषतः सिंधुदुर्ग, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी जिल्ह्यात जोरदार पावसाची शक्यता अधिक जाणवते.

# ईमारती अभावी १० वर्षांपासून जिल्हा परिषद शाळा भरते लिंबाच्या झाडाखाली





## अंबाजोगाई तालुक्यातील चनई तांडा वसतीशाळा

बीड । प्रतिनिधी

अंबेजोगाई शहरापासून ७ किलोमीटर अंतरावरील चनई ग्रामपंचायत अंतर्गत चनई तांडा येथील १०० जवळपास लोकसंख्या असलेल्या चनई तांडा याठिकाणी २०१४ पासुन जिल्हा परीषदेची प्राथमिक शाळा सुरू झाली.इयत्ता १ ले ५ वी पर्यंतचे विद्यार्थी या शाळेत शिक्षण घेत असुन गेल्या १० वर्षांपासून शासनाच्या वेळकाढू धोरण आणि दफ्तर दिरंगाई मुळे शाळेला ईमारत न मिळाल्याने ही शाळा आजही लिंबाच्या झाडाखाली भरते. शाळेत नियुक्त दोन्ही शिक्षक तांड्यावर येतात.जमा झालेले विद्यार्थी झाडाखाली जाऊन उभे राहतात.प्रार्थना होते आणि अध्ययन सुद्धा त्याच ठिकाणी ना बेंच ना मुलांना शिकवण्यासाठी फळा,सडा टाकून साफसफाई केलेल्या जमिनीवर बसुन विद्यार्थी शिक्षण घेतात.दहा वर्षात शाळेला अनेक शिक्षण विभागातील अधिकारी, कर्मचारी, राजकीय पुढाऱ्यांनी भेटी दिल्या मात्र शाळेच्या स्थिती बाबत कोणाच्याही संवेदना जागे झाल्याच्या दिसुन येत नाही. पावसाळ्यात चिखल होतो म्हणून वस्तीवरील लहु आडे यांनी स्वतः चे राहते घर विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून वापरासाठी दिलेले आहे. मात्र हि संवेदनशीलता लोकप्रतिनिधी आणि अधिकारी वर्गामध्ये दिसून येत नाही याचे वैषम्य वाटते.सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे यांनी चनई तांडा वस्ती शाळेसाठी किमान १ रूम बांधण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात येऊन बांधकाम तातडीने पूर्ण करण्यात यावे अशी मागणी जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद बीड यांना लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

शाळेसाठी ईमारत नसल्याने लिंबाच्या झाडाखाली १० वर्षांपासून शाळा भरते.पावसाळ्यात मात्र चिखल होत असल्याने मुले शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी लहु आडे यांनी आपले राहते घर उपलब्ध करून दिले असुन आम्ही दिवसभर शेतात राबण्यासाठी जातो.संध्याकाळी येतो.दिवसभर तुम्ही मुलांच्या शाळेसाठी घर वापरा म्हणत संवेदनशीलता दाखवली ती कौतुकास्पद आहे.हि संवेदना मात्र लोकप्रतिनिधी आणि अधिकारी वर्गात दिसुन येत नसल्याचे संतापजनक आहे. बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या ११ तालुक्यातील ३४९ शाळांच्या ५९२ वर्गखोल्या अत्यंत धोकादायक असुन ४६९ शाळांमधील ८५६ वर्गखोल्यांची तातडीने दुरुस्ती करणे आवश्यक आहे.मात्र लोकप्रतिनिधी धार्मिक स्थळांसाठी कोट्यवधींचा निधी देताना ज्ञानमंदिरासाठी निधी उपलब्ध करून देण्यात निरूत्साही दिसून येत असुन जिल्हा प्रशासन आणि शिक्षण विभागालाही याचे गांभीर्य दिसून येत नाही. हि अतिशय खेदाची बाब आहे.

## तहसीलचे सर्व्हर डाऊन विविध प्रमाणपत्र मिळण्यास अडचणी



धारूर । प्रतिनिधी

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना व शालेय विद्यार्थ्यांना लागणारी विविध प्रमाणपत्र मिळण्यास अडचणी येत आहेत रहिवासी उत्पन्नाचा दाखला जात प्रमाणपत्र सह इतर प्रमाणपत्र तहसील कार्यालयाच्या ऑनलाइन प्रणाली द्वारे वाटप केले जातात परंतु मागील दहा ते बारा दिवसापासून सर्वर डाऊन असल्यामुळे विद्यार्थी व लाडकी बहीण योजना चा लाभ घेण्यास अडचणी येत आहेत.

शाळा महाविद्यालय सुरू झाली आहेत विविध अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांना जात प्रमाणपत्र वडिलांचे उत्पन्नाचे प्रमाणपत्र रहिवासी प्रमाणपत्र ची आवश्यकता लागते परंतु दिनांक एक सात २०२४ पासून तहसील कार्यालयाचे सर्वर डाऊन असल्यामुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवेशाकरिता अडचणी येत आहेत तसेच नुकतीच जाहीर केलेली मुख्यमंत्री लाडकी बहीण माझी या योजनेसाठी देखील पतीच्या उत्पन्नाचा दाखला आवश्यक आहे महिलांना सदरील योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज करताना आपल्या पतीचे उत्पन्नाचे प्रमाणपत्र सादर करावयाचे आहे परंतु मागील १० ते १२ दिवसापासून सर्वर डाऊन असल्यामुळे महिलांना देखील नाहक त्रास सहन करावा लागत आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष घालून विद्यार्थी व महिलांना प्रमाणपत्र सुरळीत वाटप करावेत अशी मागणी महिला विद्यार्थी मधून केली जात आहे.

दिनांक ०१/०७/२०२४ पासून तहसील कार्यालयातील ऑनलाईन प्रणालीचे सर्वर डाऊन असल्यामुळे प्रमाणपत्र वाटपासाठी वेळ लागत आहे ऑनलाइन प्रणाली सुरळीत सुरू झाल्यास सर्व प्रमाणपत्र तात्काळ वाटप करण्यात येतील.

डी. पतंगे तहसील कर्मचारी

## थोडक्यात

### शिवा पुरस्कारासाठी प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

वीरशैव लिंगायत समाजाच्या सामाजिक,शैक्षणिक, आर्थिक विकास होण्यासाठी कलात्मक,समाज प्रबोधन व साहित्यीक क्षेत्रात कार्य करणा-या कलावंत, साहित्यीक, समाज प्रबोधनकार आणि समाज सेवकांना तसेच समाजासाठी कार्य करणा-या संस्थाना प्रतिवर्षी वैशाख शुध्द (अक्षय तृतीया) या दिवशी एक व्यक्ती व एक संस्था यांना महात्मा बसवेश्वर सामाजिक समता-शिवा पुरस्कार देण्यात येणार आहे.यासाठी प्रस्ताव सादर करावेत असे आवहान इतर मागास बहुजन कल्याणचे सहाय्यक संचालक यांनी केले आहे. प्रस्ताव सादर करतांना विरशैव- लिंगायत समाजासाठी करण्यात आलेले कार्य या संदर्भातील माहिती व कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे. त्याबाबतचे प्रस्ताव विहित नमून्यात दि. २६ जुलै २०२४ पर्यंत सहाय्यक संचालक इतर मागास बहुजन कल्याण कार्यालय डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन ४ था मजला येथे विहित नमून्यात सादर करावेत.

### अनु.जाती व नवबौध्द घटकांसाठी मार्जिन मनी योजना

बीड । प्रतिनिधी

केंद्र शासनाच्या स्टॅंडअप इंडिया योजनेत अनु. जाती व नवबौध्द समाजाच्या घटकांसाठी मार्जिन मनी योजना सुरु करण्यात आलेली आहे. या योजनेच्या मार्गदर्शक सूचना शासन स्तरावरुन निश्चित करण्यात आलेल्या असून शासनाच्या ... या संकेत स्थळावर निरिक्षणासाठी उपलब्ध आहे. सदर योजनेसाठी इच्छुक लाभार्थ्यांनी सहाय्यक आयुक्त समाज कल्याण यांच्याकडे शासन निर्णयातील नमू करण्यात आलेल्या सर्व अटी व शर्तीची पुर्तता करुन परिपूर्ण प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन, समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त यांनी केले आहे.

### आण्णाभाऊ साठे जयंती उत्सव समिती जाहीर

बीड प्रतिनिधी- साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे बीड सार्वजनिक जयंती उत्सव समिती अध्यक्षपदी अक्षय कोकाटे तर सचिव पदी विशाल चांदणे निवड करण्यात आली आहे. अजिंक्य भैय्या चांदणे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच भारत कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमध्ये सर्वानुमते या निवडी करण्यात आले आहेत. प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी मोठ्या व व्यापक स्वरूपात जयंती उत्सव साजरा करण्याचे बैठकीत ठरले आहे. पेठ बीड सार्वजनिक जयंती उत्सव समिती तर्फे विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती सांगण्यात येत आहे.

# मतिमंद विद्यालयातील विद्यार्थ्यांना केले शैक्षणिक साहित्याचे वाटप

अंबाजोगाई । प्रतिनिधी


जोधप्रसादजी मोदी विद्यालयाचा माजी विद्यार्थी रोहित ढवारे याने स्वतःच्या वाढदिवसानिमित्त मानव विकास मतिमंद विद्यालयातील विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्याचे वाटप केले. यावेळी संस्थेचे संस्थापक सचिव राजकिशोर मोदी ,आदित्य गोविंदवाड , शरद राठोड,रोहन जाधव,प्रमोद जाधव,ओमकार कासारे हे उपस्थित होते.

याप्रसंगी राजकिशोर मोदी यांनी फोटोग्राफर रोहित ढवारे याचे वाढदिवसा निमित्ताने अभिष्टचिंतन केले. आजकालचा युवक हा सामाजिक भान विसरून गैरमार्गाचा अवलंब करतांना दिसून येत आहे. मात्र त्यांला रोहित हा अपवाद ठरला असल्याचे राजकिशोर मोदी यांनी याप्रसंगी सांगितले. आजच्या युवकांत केस वाढविणे, व्यसनाच्या आहारी जाणे, थोरामोठ्यांचा अनादर करणे याचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढल्याचे दिसत आहे.



मात्र अशाही परिस्थितीत रोहित ढवारे व त्याचे सहकारी हे समाजाभिमुख काम करत असल्याबद्दल राजकिशोर मोदी यांनी आनंद व्यक्त केला. रोहित याने श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्याच जोधाप्रसादजी मोदी विद्यालयात आपले शिक्षण घेतले आहे . आपणास याच शैक्षणिक संस्थेने घडविले आहे तेव्हा आपण ही आपल्या परीने येथील विद्यार्थ्यांसाठी कोठेतरी खारीचा वाटा उचलला पाहिजे याच सामाजिक भावनेने इतर अनाठायी खर्च टाळून याच संस्थेच्या मानव विकास विद्यालयातील विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्य वाटप करण्याचा मानस करत साहित्याचे वाटप केले. याच कार्याचा आदर्श समाजातील इतरही युवक घेऊन समाजात आपले नाव उज्वल करतील अशी अपेक्षा याप्रसंगी मोदी यांनी व्यक्त केली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रोहित ढवारे याचे सहकारी सत्यम भन्साळी, सूरज साळवे , निलेश साळवे , युवराज लखेरा , साखरे जगदीश, सौरभ पांचाळ , ऋषिकेश कडबाने , दीपक जाधव, वैभव पांचाळ, मयूर शेळके यांनी सहकार्य केले. या कार्यक्रमास मानव विकास विद्यालयाचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तथा विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आष्टी इंजिनिअरिंग कॉलेजचा उत्कृष्ट निकाल



आष्टी । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ मुंबई उन्हाळी परीक्षा २०२४ चा निकाल जाहीर झाला असून आष्टी येथील इंजिनिअरिंग कॉलेज (पॉलिटेक्निक ) ने याही वर्षी आपल्या निकालाची उज्वल परंपरा कायम राखली असल्याची माहिती प्राचार्य संजय बोडखे यांनी दिली आहे.

कॉम्प्युटर विभाग (अंतिम वर्ष) बोडखे श्वेता महादेव ८१.७१%प्रथम,बागल वैष्णवी दत्ता ८१.७१%प्रथम,तायडे निरज बालकृष्णा ७९.०३%द्वितीय,राऊत रोहित गजाभाऊ ७८.०६%तृतीय मेकॅनिकल विभाग (अंतिम वर्ष) गळगटे प्रविण हरिभाऊ ७९.६४%प्रथम,शेख नदीम गफ्फार ७८.४४%द्वितीय,सपकाळ धिरज चंद्रकांत ७७.४५% तृतीय सिव्हिल विभाग (अंतिम वर्ष ) शेख मोहिमोदीन इरफान ७९.३२% प्रथम,गिते संकेत सुरेश ७८.३७ द्वितीय . तसेच प्रथम वर्ष, द्वितीय वर्ष , अंतिम वर्षातिल सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेचे चेअरमन माजी आमदार भीमराव धोंडे, संचालक अजय दादा धोंडे, प्रशासन अधिकारी डॉ डी बी राऊत ,शिवदास विधाते, माऊली बोडखे, संजय शेंडे, प्राचार्य संजय बोडखे, व कॉलेज मधील सर्व प्राध्यापक यांनी अभिनंदन केले आहे.



**आष्टी : शहरांमध्ये जैन श्रावक संघ्याच्यावतीने जैन साधू परमपूज्य अनुप्रेक्षाजी म. सा.,परमपूज्य श्रुती प्रभाजी म. सा., परमपूज्य ऋजू प्रभाजी म.सा. या तीन सांध्विंच्या प्रवेशात चातुर्मासास आज शुक्रवार दि.१३ जुलै रोजी पासुन आरंभ झाला. पवित्र असलेल्या आणि भक्तिमय असणाऱ्या चातुर्मास निमित्त आज सकाळी आष्टी शहरातून निघालेल्या शोभायात्रेत सहभाग घेत चातुर्मासाच्या निमित्ताने सर्वांना शुभेच्छा दिल्या.यावेळी आष्टी जैन श्रावक संघाच्या वतीने युवा नेते जयदत्त भैय्या धस यांचा सन्मान करण्यात आला.**

# लाडकी बहीण योजनेचे अर्ज मिशन मोडवर भरुन घ्यावे-जिल्हाधिकारी

बीड । प्रतिनिधी

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने'चे अर्ज पुढील दोन दिवस शिबिर लावून मिशन मोडवर भरुन घ्या, असे निर्देश जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी जिल्हा प्रशासनाला दिले. आज जिल्हाधिकारी बीड यांनी बीड जिल्हयातील सर्व तहसिलदार, गटविकास अधिकारी, मुख्यधिकारी नगर परिषद / नगरपंचायत, बाल विकास प्रकल्प अधिकारी ग्रामीण / शहरी यांची ऑनलाईन बैठक घेवून 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने'ची प्रभावी अमलबाजवणी करणेसाठी सूचना दिल्या.मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने'' साठी ''नारी शक्तिदूत'' ऍ़प्व्दारे अर्ज भरताना संबधित महिलेचे नांव जन्म दिनांक, संपुर्ण पत्ता आदी माहिती आधारकार्ड नुसारच भरणे अनिवार्य करण्यात आले आहे. गावपातळीवर तसेच नगर पलिका,नगर पंचायत अंगणवाडी केंद्रामध्ये ऑन लाईन अर्ज भरण्यास येणा-या समस्या, तांत्रिक अडचणी पाहता ऑफलाईन अर्ज भरण्याची सुविधा सुरु करण्यात आली आहे.

या संदर्भात जिल्हाधिकरी बीड यांनी संबधित विभागास सूचना दिलेल्या आहेत. ''मुख्यमंत्री लाडकी बहीण योजने'' बीड जिल्हयातून मोठया प्रमाणात अर्ज भरण्यात येत आहेत. लाभार्थी महिलेला १५००/- रुपये थेट डी.बी.टी.व्दारे बँक खात्यावर जमा होणार आहे.त्यामुळे यात कोणतेही अडचण येऊ नये म्हणून योग्य त्या उपाययोजना करण्यात येणार आहेत. असे होईल नारी दूध ॲपच्या माध्यमातून अद्यावतीकरण नारी शक्तिदूत'' ऍ़प्मध्ये लाभार्थी महिलेचे नाव भरताना त्यांच्या आधारकार्डवर जे नाव आहे तेच नाव अर्जात लिहावे , आधार कार्डवरील जन्म दिनांक ऍ़प्मध्ये नोंदवावा आधारकार्डवरील जन्म दिनांक नसल्यास जन्म दाखल्यावरुन जन्म दिनांक घेण्यात यावा. आधारकार्डनुसार अर्जदाराचा संपूर्ण पत्ता आणि अन्य माहिती तंतोतत भरावी. अशी सुचना करण्यात आली आहे.

आधारकार्डवरील नावाप्रमाणे बँकेच्या खात्यावरही तेच नाव असल्याची खातरजमा करावी. आधार क्रंमाक बँकेशी संलग्न असल्याची खात्री करुन तशी माहिती ऍ़प्मध्ये भरावी अशी सूचना करण्यात आली आहे. बीड जिल्हयातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सर्व शाखानी महिलांचे ''मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने'' साठी बँक खाते शुन्य ठेव स्वरुपात उघडण्याची तात्काळ कार्यवाही करावी अशा सूचना जिल्हाधिकारी बीड यांनी दिल्या आहेत.

शनिवार व रविवार रोजी दिवसभर बीड जिल्हयात ''मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना'' कॅम्प आयोजित करण्यात येणार आहेत. त्यामुळे तलाठी, ग्रामसेवक, अंगणवाडी सेविका, पर्यवेक्षिका, नगर परिषद क्षेत्रीय वार्ड अधिकारी यांनी कॅम्प करिता उपस्थित राहावे. अशा सूचना यावेळी देण्यात आल्या आहेत. सदर बैठकीस मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती संगितादेवी पाटील, उप-मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)श्री.मोकाटे उप-मुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क) केकान उपस्थित होते.

## लाडकी बहिन व लेक लाडकी या योजनेसाठी पोस्ट ऑफीसमध्ये खाते उघण्याचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

राज्य शासनाच्या महिला व बाल विकास विभागातर्फे मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण व लेक लाडकी या योजना सुरु करण्यात आल्या असून या योजनांचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांनी जवळच्या पोस्ट ऑफिसमध्ये बचत खाते उघडावे, असे आवाहन अधीक्षक डाकघर बीड विभाग बीड यांनी केले आहे.या दोन्ही योजनांचा लाभ घेण्याची कार्यपद्धती शासनाच्या महिला व बाल विकास विभागमार्फत राबविण्यात येत असून आर्थिक लाभ पद्धतीने देण्यात येणार आहे. यासाठी बचत खाते उघडणे आवश्यक असून ते जवळच्या कोणत्याही पोस्त ऑफिस मध्ये उघडता येईल.मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण या योजने अंतर्गत तिच्या स्वतःच्या बचत खात्यात थेट रु. १ हजार ५०० इतकी रक्कम जमा करण्यात येणार आहे. यासाठी पोस्ट ऑफिस मध्ये बचत खाते उघडण्यासाठी आधार कार्ड,पॅन कार्ड व ३ फोटो ई. कागदपत्रे आवश्यक आहेत.

तसेच लेक लाडकी या योजने अंतर्गत लाभार्थ्यांना विविध टप्प्यावर देण्यात येणारा लाभ थेट बचत खात्यावर जमा करण्यात येईल. यासाठी पोस्ट ऑफिसमध्ये बचत खाते उघडण्यासाठी मुलीचे जन्म प्रमाणपत्र ,मुलीचे आधार कार्ड, आईचे आधार कार्ड, पॅन कार्ड व ३ फोटो ई. कागदपत्रे आवश्यक आहेत.बीड जिल्ह्यातील पात्र महिला लाभात्यांनी आपल्या जवळच्या पोस्टऑफिस मध्ये चे खाते अथवा इंडिया पोस्ट पेमेंट बँकेचे खाते उघडून घ्यावे. भारतीय डाक विभाग बीड अंतर्गत जिल्ह्यातील एकूण ३४२ पोस्ट ऑफिस तत्पर सेवेत अग्रेसर आहे. तसेच या योजनेअंतर्गत पोस्ट ऑफिसमध्ये जास्तीत जास्त नागरिकांनी खाते उघडावेत.

राज्य लोकतंत्र
शनिवार दि.१३ जुलै २०२४


# राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने परळीत १५ ते २६ जुलै दरम्यान मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत नोंदणी करण्यासाठी खास मोहीम

## ना.धनंजय मुंडे, उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार, पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त परळीत विशेष आयोजन



**परळी वैद्यनाथ । प्रतिनिधी**

राज्य शासनाने नव्याने सुरू केलेल्या व महिलांसाठी अत्यंत उपयुक्त ठरत असलेल्या 'मुख्यमंत्री माजी लाडकी बहीण योजने'मध्ये नव्याने नाव नोंदणी करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी परळी च्या वतीने विशेष नोंदणी अभियान दि. १५ जुलै ते २६ जुलै च्या दरम्यान संपूर्ण परळी शहरामधून राबविण्यात येणार आहे.

१५ ते २६ जुलै या दरम्यान राज्याचे कृषिमंत्री तथा परळीचे लाडके आमदार ना. धनंजय मुंडे राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री ना. अजितदादा पवार तसेच भाजपने त्या मा. पंकजाताई मुंडे यांच्या जन्मदिवसाच्या औचित्य साधून या विशेष अभियानाचे आयोजन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने करण्यात आले आहे.

या नोंदणी अभियानासाठी परळी वैजनाथ शहरातील प्रत्येक वार्डमध्ये नोंदणी अभियानाची व्यवस्था करण्यात आली असून महिला भगिनींनी योजनेसाठी आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे घेऊन आपल्या वार्डातील निश्चित करण्यात आलेल्या नोंदणी स्थळी संपर्क साधून आपली नोंदणी करून घ्यावी असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष बाजीराव धर्माधिकारी यांनी केले आहे.

**महामॅरेथॉन स्पर्धा**

राज्याचे कृषीमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसा निमित्त सोमवार दिनांक १५ जुलै रोजी सकाळी ७:०० वाजता राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, परळी-वै च्या वतीने शालेय गट,खुला गट,ज्येष्ठ नागरिक गट,महिला गट या चार गटात 'महामॅराथॉन स्पर्धा' आयोजित केली असून ' ... ' हा निर्धार या 'महामॅराथॉन' स्पर्धेच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. 'महामॅराथॉन' स्पर्धेत प्रत्येक गटात आकर्षक पारितोषिक,मानचिन्ह प्राप्त होणार असून सहभागी होणाऱ्या प्रत्येक स्पर्धकास सहभाग प्रविण्य प्रमाणपत्र आणि एक वृक्ष भेट दिले जाणार आहे....तेंव्हा आबालवृद्ध नागरिकांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवून 'हरीत परळी.. स्वच्छ परळीचा निर्धार घ्यावा! स्पर्धा सुरु होण्याचे ठिकाण परळी शहर पोलीस स्टेशन समोरुन 'संत सेवालाल महाराज चौक' असून थेट स्पर्धा ठिकाणी नोंदणी करण्यात येईल तसेच पूर्वनोंदणी करण्यासाठी परळी तालुका शारीरिक शिक्षक संघटनेचे अध्यक्ष एस.पी.मुंडे सर ९४२१२७१६०८, राष्ट्रवादी शिक्षक आघाडीचे अध्यक्ष अजय जोशी सर ९८५०४१७८१७ यांना व त्यांच्या सहकारी शिक्षक तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पदाधिकारी यांना संपर्क करावा....प्रत्येकाने सहभाग नोंदवावा असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने करण्यात आले आहे.

# रोजगार हमीचे पैसे लाभार्थ्याऐवजी ग्रामपंचायतच्या खात्यात

## कोट्यावधींची उलाढाल देते भ्रष्टाचाराला चालना -ॲड.अजित देशमुख

**बीड । प्रतिनिधी**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत वैयक्तिक लाभाची कामे शेतकऱ्यांना दिली जातात. शासन नियम आणि परिपत्रकानुसार या कामाचे देयक थेट लाभार्थ्याच्या खात्यात जमा करण्याचे आदेश आहेत. मात्र भ्रष्टाचाराला मोठा वाव मिळावा म्हणून लाभार्थ्याच्या खात्याऐवजी थेट ग्रामपंचायतच्या खात्यात हे पैसे पाठविले जातात. तेथून त्याची टक्केवारीनुसार विल्हेवाट लावली जाते. त्यामुळे लाभार्थ्याचे खाते ऐवजी ग्राम पंचायतच्या खात्यात पैसे जमा करणाऱ्या जिल्ह्यातील सर्व अधिकाऱ्यांवर गुन्हा नोंदवून त्यांची चौकशी करण्याची मागणी जन आंदोलनाचे विश्वस्त ॲड.अजित एम. देशमुख यांनी केली आहे.

शासनाच्या धोरणानुसार रोजगार हमीची योजनेचे आयुक्त, नागपूर यांनी वैयक्तिक लाभाच्या योजनांचे कुशल देयके देखील लाभार्थ्याच्या खात्यात थेट जमा करण्याचे आदेश दि. १७ मे २०१८ रोजी या परिपत्रकांनुसार दिलेले आहेत. मात्र या आदेशाची अंमलबजावणी होत नाही, हे वरिष्ठांना माहीत असताना देखील संगणमत केले जात आहे.



धोंडराई सह जिल्ह्यातील अनेक ग्रामपंचायतीमध्ये या प्रकारचा घोटाळा होत आहे. लाभार्थ्याने कोणत्याही योजनेचा लाभ मागितला तर त्याच्याकडून संपूर्ण कागदपत्र भरून घेणे आवश्यक असते. मात्र खाते नंबर न घेता अन्य कागदपत्रे घेतली जातात. आणि ती देखील बारकाईने तपासली जात नाहीत. कुठल्या तरी कमतरता दाखवून लाभार्थ्याला गंडविले जाते.

रोजगार हमी योजनेसाठी शासनाने एक स्वतंत्र कायदा केला असून या कायद्यात या योजनांमध्ये होणाऱ्या भ्रष्टाचारावर कठोर कारवाई करण्याची तरतूद आहे. मात्र या तरतुदी देखील जिल्हा प्रशासनाने गुंडाळून ठेवल्या आहेत. प्रायोगिक तत्त्वावर धोंडराई तालुका गेवराई या ग्रामपंचायतचा कारभार तात्काळ तपासावा. त्याचप्रमाणे बीड सह आष्टी आणि परळी या दोन तालुक्यातील कारभार देखील लगेच तपासला जावा. जिल्हाभरातील सर्व गटविकास अधिकाऱ्यांना याबाबत आदेशित करण्यात यावे, अशी देखील मागणी करण्यात आली आहे. गंभीर स्वरूपाच्या या मुद्द्यावर धोरणात्मक बदल होत नाही, तोपर्यंत आम्ही पाठपुरावा करू. दोषी अधिकारी हे आर्थिक विनियोगाचा व्यवस्थित वापर करू शकले नाहीत. शासनाचे नियम पाळले नाहीत. त्यामुळे त्यांच्यावर फौजदारी गुन्हे नोंदवून चौकशी करण्याची मागणी देखील ॲड. अजित देशमुख यांनी केली आहे.

# बनावट नावासह चक्क जात खोटी सांगून दिली फिर्याद

## जवळगाव स्फोट प्रकरणात नवीन ट्विस्ट; फिर्यादीवरच फसवणुकीचा गुन्हा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

विहिरी खोदण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या जिलेटीनचा स्फोट करून चक्क पान टपरी उडवून देण्यात आल्याची घटना अंबाजोगाई तालुक्यातील जवळगाव येथे तीन महिन्यापूर्वी घडली होती. अनैतिक प्रकरणातून हा स्फोट घडविण्यात आल्याचे निष्पन्न झाल्यानंतर सदरील पानटपरी चालकाच्या फिर्यादीवरून चौघांवर गुन्हा दाखल करण्यात आला होता. मात्र आता या प्रकरणाला वेगळे वळण लागले असून यातील फिर्यादी हा स्वतःची मूळ ओळख लपवून बनावट नावाने आणि जात बदलून बेमालूमपणे जवळगावात राहत असल्याचे पोलीस तपासात उघड झाले आहे. पोलिसांनी त्याच्यावर फसवणुकीचा गुन्हा देखील नोंदवला आहे.

अशोक सुभाष भालेराव याने स्फोट प्रकरणात फिर्याद दिली होती. त्यानुसार चौघांवर जीवे मारण्याचा प्रयत्न आणि स्फोटके अधिनियमान्वये बर्दापूर पोलिसात गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले. या गुन्हयाचा तपास करत असताना तपासात यातील फिर्यादी अशोक सुभाष भालेराव यांचे मुळ नाव योगेश सुभाष काळे (रा. शिंदाळा, ता. औसा, जि,. लातुर) असल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले. त्यामुळे पोलिसांनी शिंदाळा येथे जावून माहिती घेतली असता त्याची आई सुभद्रा सुभाष काळे व भाऊ हनुमंत सुभाष काळे यांची ओळख पटली आणि त्यांची जात लिंगायत असल्याचे निष्पन झाले. सदर माहितीच्या आधारे पोलिसांनी अशोकला पोलिसीखाक्या दाखवताच त्याने त्याचे मूळ नाव योगेश सुभाष काळे असून लिंगायत जात असल्याचे सांगितले. २००५ साली त्याचे वैशाली सोबत ओळख होऊन प्रेमसबंध जुळले होते. त्यांनी २००८ साली लग्न केले आणि त्यानंतर तो नाव बदलून आणि मातंग समाजाचा असल्याचे सांगून जवळगाव येथे राहू लागला. मातंग जात बदलेले जातीचे प्रमाणपत्र त्याचे जवळ नाही, तसेच त्याने नाव बदलताना कोणतेही गॅझेट करुन घेतले नसून न्यायालयात ॲफिडेव्हिट न करता कोणतीही कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केलेली नाही. तरीसुद्धा खोटी माहिती देऊन त्याने आधार कार्ड, पण कार्ड, आयुष्यमान कार्ड, मतदान कार्ड काढून बँकेत खाते देखील काढल्याचे तपात उघड झाल्याने पोलीस उपनिरिक्षक प्रमोद यादव यांनी अशोकच्या विरोधात तक्रार दिली. सदर तक्रारीवरून अशोक उर्फ सुभाष याच्यावर फसवणुकीचा गुन्हा नोंदवण्यात आला. पुढील तपास पोलीस हवालदार चेवले करत आहेत.

# पंकजा मुंडे विधानपरिषदेवर विजयी

## शहरात कार्यकर्त्यांकडून ठिकठिकाणी जल्लोष

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजा मुंडे यांना पक्षाच्या वतीने विधानपरिषदेवर उमेदवारी घोषित करण्यात आली होती. शुक्रवारी (ता.१२) झालेल्या मतदानात विजयी झाल्याबद्दल शहरात विविध ठिकाणी गुलाल उधळून, फटाक्यांची आतिषबाजी करत स्थानिक कार्यकर्त्यांनी आनंदोत्सव साजरा केला.



भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजा मुंडे यांचा मागच्या विधानसभेत पराभव झाल्यापासून त्यांचे पक्षाच्या वतीने पुर्नवसन करा अशी मागणी समर्थकांच्या माध्यमातून सातत्याने होत होती. पंकजा मुंडे यांचे राज्यसभा, विधानपरिषदेच्या निवडणूक वेळोवेळी संभाव्य यादीत नाव येत होते. पण पाच वर्षांत काही नंबर लागला नाही. यामुळे पक्षाने लोकसभेच्या निवडणूकीत डॉ प्रितम मुंडे यांच्या जागी पंकजा मुंडे यांना उमेदवारी देण्यात आली. या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे बजरंग सोनवणे यांनी पंकजा मुंडे यांचा पराभव केला. यानंतर महाराष्ट्रातील समिकरणे बघता व ओबीसी, मराठा आरक्षण प्रश्न तसेच विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर पंकजा मुंडे यांना पद देणे आवश्यक होते. हे लक्षात घेऊन केंद्रीय पातळीवर पंकजा मुंडेसह पाच जणांना विधानपरिषदेत उमेदवारी जाहीर करण्यात आली होती. शुक्रवारी झालेल्या मतदानत पंकजा मुंडे या २६ मते घेऊन विजयी झाल्या. यावेळी भाजपसह व राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) व महायुतीच्या वतीने शहरातील मुख्य चौकात छत्रपती शिवाजी महाराज चौक, राणी लक्ष्मीबाई टॉवर चौक, पंकजा मुंडे यांचे यशश्री निवासस्थान, धनंजय मुंडे यांचे जगमित्र कार्यालयात फटाक्यांची आतिषबाजी, गुलाल उधळून व पेढे वाटप करुन आनंदोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी भाजप, राष्ट्रवादी काँग्रेसचे स्थानिक पदाधिकारी उपस्थित होते.

# कुंडलीक खांडेंचा जामीन फेटाळला

**बीड। प्रतिनिधी**

शिवसेना उपजिल्हाप्रुखावरील प्राणघातक हल्ला प्रकरणातील आरोपी, शिवसेना माजी जिल्हाप्रमुख कुंडलीक खांडे यांचा जामीन अर्ज बीडच्या जिल्हा न्यायालयाने फेटाळला आहे. न्या. के. आर. जोगळेकर यांनी हा निर्णय दिला.



शिवसेनेचे उपजिल्हाप्रुख ज्ञानेश्वर खांडे यांच्यावर झालेल्या प्राणघातक हल्ला प्रकरणात शिवसेनेचे तत्कालीन जिल्हाप्रमुख कुंडलीक खांडेकर इतरांवर गुन्हा दाखल झाला होता. या प्रकरणात तब्बल तीन महिन्यानंतर पोलीसांनी कुंडलीक खांडे याला अटक केले होते. ६ दिवसाच्या पोलीस कोठडी नंतर मागील आठवड्यात कुंडलीक खांडे ला न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली होती. त्यानंतर खांडे यांनी जामिनासाठी बीडच्या जिल्हा न्यायालयात धाव घेतली होती. त्या जामीन अर्जावर न्या. के. आर. जोगळेकर यांच्यासमोर सुनावणी झाली. सरकारपक्षासह मुळ फिर्यादीचे वकील मंगेश पोकळे यांनी या जामिनाला जोरदार विरोध केला होता. दोन दिवसांपूर्वी न्यायालयाने या प्रकरणात निकाल राखून ठेवला होता. शुक्रवारी न्यायालयाने हा जामीन फेटाळण्याचा निर्णय दिला. कुंडलीक खांडे साठी हा मोठा धक्का मानला जात आहे.




रामकृष्ण लॉन्स येथे डरपे आणि जाधव परिवाराच्या विवाह प्रसंगी शिवसंग्रामच्या राष्ट्रीय अध्यक्षा डॉ.ज्योतीताई विनायकराव मेटे यांनी उपस्थित राहून वधू-वरांना शुभाशीर्वाद दिले याप्रसंगी सुहास आबा पाटील,ज्ञानेश्वर कोकाटे,मनोज जाधव, शैलेशभैय्या सुरवसे,शेख नासिर हे उपस्थित होते.

# मुर्शदपुर ग्रा.पं.रस्ते कामांना ९ कोटी रुपये मंजूरी

## माजी राज्यमंत्री सुरेश धस यांचे जाहीर आभार -सरपंच शालन मुळे

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी विधानसभा मतदारसंघातील रस्तेकामांसाठी शासनाकडून निधी खेचून आणत पुरवणी अर्थसंकल्पीय अधिवेशनात आष्टी विधानसभा मतदारसंघातील विविध रस्ते कामांसाठी २५ कोटी रुपये निधी मंजूर करून मास्टर स्ट्रोक मारला असून त्यामध्ये मुर्शदपूर, कासारी, शिदेवाडी या ग्रामपंचायत अंतर्गत जाणाऱ्या रस्त्यांसाठी ९ कोटी रुपयाचा भरघोस निधी मंजूर करून आणल्याबद्दल माजी राज्यमंत्री सुरेश धस यांचे मुर्शदपुरचे सरपंच सौ.शालन अशोक मुळे यांनी जाहीर आभार मानले आहेत.





सरपंच सौ.मुळे पुढे बोलताना म्हणाले, अनेक दिवसांच्या प्रतीक्षेत असलेल्या रस्ते आता सिमेंट काँक्रिटी होणार असून आता रस्त्यांचा कायमस्वरूपी प्रश्न मिटणार आहे. हे अत्यंत महत्त्वपूर्ण रस्ते माजी राज्यमंत्री सुरेश धस यांनी वेळोवेळी पाठपुरावा करून मंजूर केल्याबद्दल मुर्शदपूर ग्रामस्थांच्यावतीने आनंद व समाधान व्यक्त केले जात आहे. माजी राज्यमंत्री सुरेश धस यांच्या ताब्यात मुर्शदपुर ग्रामपंचायत आल्यापासून विविध विकास कामाच्या माध्यमातून शहराचा कायापालट होत असल्याची भावना यावेळी ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. नव्याने मंजूर रस्ते कामामध्ये कन्या शाळा ते माऊली मंदिरापर्यंत सिमेंट काँक्रेट रस्ता करणे - ५ कोटी व आष्टी शहर ते जुना पिंप्री रस्ता करणे. (आष्टी-शिराळा रस्त्यापर्यंत) - ४ कोटी हे अत्यंत जिव्हाळ्याचे रस्ते माजी राज्यमंत्री सुरेश धस यांनी मंजूर केल्याबद्दल भारतीय जनता पार्टी व आमदार सुरेश धस मित्र मंडळ मुर्शदपुर कासारी शिदेवाडी तसेच सरपंच सौ.शालन अशोक मुळे, उपसरपंच जालिंदर वांढरे, माजी जि. प.सदस्य खंडू जाधव, युवा नेते सचिन लोखंडे, मुर्शदपुर पं.स.गणाचे सदस्य अशोक मुळे व सर्व ग्रामपंचाय सदस्य यांनी जाहीर आभार मानले आहेत.

# आ. आजबे यांच्या प्रयत्नातून मतदारसंघातील रस्ते विकासासाठी १५ कोटी रुपये मंजूर

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**


विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये आमदार बाळासाहेब आजबे यांनी मोठ्या प्रमाणावर निधी मंजूर करून घेतला असून त्यामध्ये आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघातील विविध रस्ते विकास कामासाठी १५ कोटी रुपये

एवढ्या भरघोस निधीस मंजुरी मिळाली आहे यापूर्वी आमदार बाळासाहेब आजबे यांच्या प्रयत्नातून शिंपोरा ते खुंटेफळ उपसा सिंचन योजनेसाठी १५० कोटी रुपये उपजिल्हा रुग्णालयासाठी ८८ कोटी ३४ लक्ष रुपये सुरडी व शेडाळा येथील आश्रम शाळेसाठी ३० कोटी रुपये कोल्हापुरी बंधारा व नदीवरील बॅरिकेज साठी ५० कोटी रुपये अशा विविध योजनांसाठी मोठ्या प्रमाणात आमदार



बाळासाहेब आजबे यांनी प्रयत्न करून या अधिवेशनामध्ये मतदार संघातील विविध विकास कामासाठी निधी मंजूर करून घेतला आहे.

आज अर्थसंकल्पीय अधिवेशनात पुरवण्या मागण्यांमध्ये राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी ◀◀ पान ३ वर

तुळजाभवानी सुप्रसन्न

॥ श्री अश्वत्थलिंग कृपा ॥
निमंत्रण



ह.भ.प. महादेवानंद भारती महाराज

चि.सौ.कां.शितल
श्री.पी.एम.पवार (सर) यांची नात व विजय प्रभाकर पवार रा.पिंपळवंडी यांची कन्या

चि.अभिजित
श्री.शामराव राम तिकटे रा.पाथरूड यांचे चिरंजीव

॥ यांचा शुभविवाह ॥
रविवार, दि.१४-७-२०२४ रोजी दुपारी १.१३ वा.

✻ विवाहस्थळ ✻
श्री माऊली मंगल कार्यालय, पिंपळवंडी

✻ कार्यवाहक ✻
श्री छत्रपती युवक गणेश मंडळ पिंपळवंडी


This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
शनिवार दि.१३ जुलै २०२४ । पान ७

# पुण्यात आणखी एक कारनामा उघड, मनपाच्या वसतिगृहात दारु पार्टी, १४ पार्टीबाज विद्यार्थ्यांची हकालपट्टी

**पणे । प्रतिनिधी**

शिक्षणाचे माहेरघर असलेल्या पुण्यात तरूणाई वेगळ्याच वाटेवर चालल्याचं चित्र दिसून येत आहे. पुण्यात चांगलं शिक्षण घेण्यासाठी राज्यभरातून विद्यार्थी येत असतात. बाहेरून येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सोईसाठी बांधण्यात आलेल्या पुणे महापालिकेच्या घोले रोडवरील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यार्थी वसतिगृहातून (ऊ. इरलरीरहशल -ालशवज्ञरी डींवशपीं र्कीीशश्र) धक्कादायक बातमी समोर आली आहे. या वसतिगृहामध्ये राहणारे विद्यार्थी दारू पिऊन धिंगाणा घालत असल्याचा प्रकार समोर आला आहे.



वसतिगृहामध्ये सीसीटीव्ही कॅमेऱ्याचा टीव्ही बंद असणे, कुचकामी सुरक्षा व्यवस्थेमुळे वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांमधील बेशिस्तपणा वाढत असल्याने इतर शांत विद्यार्थ्यांना त्रास होत असल्याची माहिती समोर आली आहे. शिक्षणासाठी आलेले विद्यार्थी या ठिकाणी दारू पिऊन गोंधळ घालत असल्याचा प्रकार समोर आला आहे. हा संपूर्ण प्रकार शहरातील घोले रोडवरील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यार्थी वसतिगृहातील आहे.

महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून शहरात शिक्षणासाठी आलेल्या गरीब आणि मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या सोईसाठी पुणे महानगरपालिकेने घोले रोड येथ १०८ खोल्यांचे मोठे वसतिगृह बांधण्यात आलेले आहे. या वसतीगृहात ४०० जणांच्या राहण्याची सोय करण्यात आलेली आहे. शहराच्या मध्य भागामध्ये विद्यार्थ्यांना मोफत राहण्याची सुविधा उपलब्ध करून दिल्याने विद्यार्थ्यांना आर्थिक आधार मिळतो. मात्र त्याच ठिकाणी विद्यार्थ्यांना शांततेत शिकता येत नसल्याचं दिसून येत आहे.

एका बाजूला विद्यार्थ्यांना राहण्याची मोफत सोय, जेवणासाठी पैसे दिले जात असताना दुसरीकडे वसतिगृहात दारू पिणे आणि बाकी गोष्टी सुरू असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. महापालिकेच्या पथकाने टाकलेल्या धाडीत दारूच्या बाटल्या, सिगारेटची पाकिटे, तंबाखू यासारख्या गोष्टी सापडल्या आहेत. शिकण्यासाठी जिथे विद्यार्थी येतात तिथे हा प्रकार समोर आल्यानंतर समाज विकास विभागाकडून १४ विद्यार्थ्यांची वसतिगृहातून हकालपट्टी करण्यात आली आहे.

# खडकवासला परिसरात डेंग्यूची साथ !

**पुणे । प्रतिनिधी**

खडकवासला येथे डेंग्यूची साथ सुरू आहे. दाट लोकवस्तीच्या किरकटवाडी, कोल्हेवाडी, धायरी, नऱ्हे परिसरात गॅस्ट्रो तापाच्या रुग्णांत वाढ झाली आहे. या गावांचा महापालिकेत समावेश होऊन दहा वर्षे झाली असून, हा परिसर जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाकडे आहे.

जिल्हा परिषदेची सेवा अपुरी पडत आहे, तर महापालिकेच्या दुर्लक्षामुळे साथ आटोक्यात आणण्यासाठी अद्यापही कोणत्याही उपाययोजना सुरू केल्या नसल्याचे गंभीर चित्र पुढे आले आहे. कोल्हेवाडी येथील रस्त्याचे काम अनेक दिवसांपासून अर्धवट अवस्थेत आहे. रस्त्यासाठी खोदलेल्या खड्ड्यात पाणी साठून डास-माशांचा प्रादुर्भाव वाढला आहे.




असेच चित्र खडकवासला, किरकटवाडी, नांदेड येथे आहे. पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणात अंतर्गत रस्त्यावर, तसेच नागरी वस्त्यांत साठत आहे. त्यात मैलापाणी, सांडपाण्याची भर पडत आहे. या परिसरात गॅस्ट्रो, डेंग्यू, मलेरिया, चिकुनगुनिया आशा साथीच्या आजारांचे रुग्ण वाढले आहेत. बहुतेक रुग्ण खासगी रुग्णालयांत दाखल होत असल्याने साथीच्या आजारांची लागण झालेल्या रुग्णांची माहिती प्रशासनाकडे उपलब्ध नाही. खडकवासला येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात गावातील दहा रुग्णांचे रक्ताचे नमुने तपासणीसाठी राष्ट्रीय जिवाणु प्रयोगशाळेत पाठविण्यात आले होते. त्यातील पाच रुग्णांना डेंग्यूची लागण झाली असल्याचे निष्पन्न झाले आहे.

# विठ्ठल नामाच्या गजरात रमले बाल वारकरी



**पुणे । प्रतिनिधी**

भाळी चंदनाचा टिळा लावून मुखी हरिनामाचा जयघोष करत मांडवगण फराटा (ता. शिरूर) येथील श्री शरदचंद्र पवार पब्लिक स्कूलमध्ये आषाढी एकादशीनिमित्त दिंडी सोहळा उत्साहात पार पडला.

मान्यवरांच्या उपस्थितीत विठ्ठल रूखमाई यांच्या प्रतिमेचे पूजन करत दिंडी मिरवणूक काढण्यात आली. यावेळी ठिकठिकाणी पालखीचे पूजन करण्यात आले. या सोहळ्यात विद्यार्थ्यांनी वारकरी वेश परिधान करून रिंगण धरून विठुरायाचे नामस्मरण केले. वारकऱ्यांच्या वेशभूषेतील लहान मुले श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मिरवणूक आणि विठू नामाचा गजर अशा विठ्ठलमय वातावरणात विद्यार्थ्यांचा दिंडी सोहळा रंगला.

या सोहळ्यामध्ये बाल वारकऱ्यांना खाऊचे वाटप केले. यावप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष राजीव फराटे, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर फराटे, सचिव मृणाल फराटे, संचालक संग्राम धावडे, विश्वस्त धनश्री फराटे, प्राचार्य संदीप कोकरे, प्राचार्य डॉ. हेमंत कांबळे, विवेक सातपुते, प्रवीण कुरुमकर, सर्व शिक्षक, विद्यार्थी आदी उपस्थित होते.

# कदमवाकवस्ती येथील बोगस डॉक्टरवर गुन्हा दाखल ; लोणी काळभोर पोलिसांची कारवाई

**पुणे । प्रतिनिधी**

वैद्यकीय डिग्री नसतानाही दवाखाना थाटून नागरिकांना लुटणाऱ्या कदमवाकवस्ती (ता. हवेली) येथील एका बोगस डॉक्टरवर लोणी काळभोर पोलिसांनी शुक्रवारी (ता. ११) गुन्हा दाखल केला आहे.

प्रकाश रंगनाथ तोरणे (वय ६३, सध्या रा. कदमवाकवस्ती, ता. हवेली, मूळ रा. पढेगाव, ता. श्रीरामपूर, जि. नगर) असे गुन्हा दाखल केलेल्या बोगस डॉक्टरचे नाव आहे. याप्रकरणी लोणी काळभोर येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. रुपाली रघुनाथराव भंगाळे (वय ३८) यांनी फिर्याद दिली आहे. लोणी काळभोर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, डॉ. भंगाळे या नेहमीप्रमाणे गुरुवारी आरोग्य केंद्रात रुग्णांची तपासणी करीत होत्या. तेव्हा हवेली तालुका आरोग्य अधिकारी डॉ. सुरेश गोरे यांचा त्यांना फोन आला की, कदमवाकवस्ती येथील पांडवदंड रस्त्यावर असलेल्या जनसेवा क्लिनिकमध्ये प्रकाश तोरणे हा व्यक्ती वैद्यकीय शिक्षणाचे कोणतेही प्रमाणपत्र नसताना डॉक्टर असल्याचे भासवून नागरिकांची फसवणूक करत आहे.




डॉ. गोरे यांच्या सूचनेनुसार विस्तार अधिकारी डॉ. महेश वाघमारे, डॉ. रुपाली भंगाळे व समुदय आरोग्य अधिकारी डॉ. मनोज उबरे हे लोणी काळभोर पोलिसांना घेऊन जनसेवा क्लिनिकमध्ये गेले. त्यांनी प्रकाश तोरणे याच्याकडे डॉक्टर असल्याबाबत व औषध-गोळया विक्रीबाबत महाराष्ट्र कौंसिल ऑफ मेडीसिन या परिषदेचे प्रमाणपत्राबाबत विचारणा केली. तेव्हा तोरणे यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता तो डॉक्टर असल्याचे कोणतीही शैक्षणिक पात्रता अथवा पदवी नसल्याचे समोर आले. तसेच प्रत्येक रुग्णाच्या पाठीमागे ७५ ते १०० रुपये फी घेत असल्याचे तोरणे याने कबुली दिली. त्यानंतर पोलिसांनी त्याच्याजवळील वैद्यकीय व्यवसायासाठी लागणारे साहित्य व औषध गोळ्या जप्त करून दवाखाना सील केला आहे.

दरम्यान, मागील पाच वर्षांपासून बोगस दवाखाना चालवून नागरिकांची फसवणूक केल्याप्रकरणी प्रकाश तोरणे याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास लोणी काळभोर पोलीस करीत आहेत.

# रासे येथे वृक्षदिंडीद्वारे जनजागृती




**खेड । प्रतिनिधी**

रासे (ता. खेड) येथील श्री बापदेव शिक्षण संस्थेद्वारे संचालित श्री रेणुका माध्यमिक विद्यालय व महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी संलग्न डॉ. डी. वाय. पाटील एज्युकेशन कॅडमी अंतर्गत पद्मभूषण वसंत दादा पाटील कृषी महाविद्यालय आंबी तळेगाव दाभाडे यांच्या वतीने वृक्षदिंडीचे आयोजन केले होते. यावेळी विद्यार्थ्यांनी फेरी काढून जनजागृती केली. तसेच, प्रत्येकाने एक झाड लावून ते वाढविण्याचा निर्धार केला.

यावेळी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सुवर्णा वाळुंज, शिक्षक संजीव भोर, संजयकुमार पिचके, संतोष काळे, कल्पना गायकवाड, वसंत मुंगसे, संदीप पाटील, राजेंद्र शिंदे, नितीन कडलग, ऋतुजा दिवेकर, मंजुश्री धाडगे, निकीता धाकतोडे, सानिका धादवड, मोनू राठोड, ज्ञानेश्वरी वारुळे, बापदेव शिक्षण संस्थेचे पदाधिकारी, ग्रामस्थ आदी उपस्थित होते.

# ओढ्यात समाजकंटकांनी सोडले नायट्रिक ॲसिड

**शिरूर । प्रतिनिधी**

गणेगाव खालसा (ता. शिरूर) येथील कामिनी ओढ्यात समाजकंटकांनी नायट्रिक ॲसिड टाकल्याचा धक्कादायक प्रकार बुधवारी (दि. १०) रात्री उघडकीस आला. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्यासह शेतीपिकांना धोका निर्माण होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. त्यामुळे स्थानिकांनी पुढील काही दिवस कोंढापुरी तळ्यातील पाणी वापरू नये, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

गणेगाव हद्दीतील नवीन पुलाजवळ कामिनी ओढ्याच्या वाहत्या पाण्यात बुधवारी रात्री वाहनातून चालकाने नायट्रिक ॲसिड सोडले. त्यामुळे परिसरात उग्र स्वरूपाचा दर्प पसरला आहे. त्याच बरोबर ज्या ठिकाणी हे ॲसिड सोडले तेथील गवत व झाडेही जळून गेली आहेत. ॲसिडमुळे पाणी दूषित झाले असून, त्यांचा रंग तांबड्या मातीसारखा झाला आहे. ओढ्यातील पाणी कोंढापुरी येथील तळ्यात जाते व याच तळ्यातून रांजणगाव गणपती, शिक्रापूर गावच्या पाणीपुरवठा योजना तसेच शेकडो शेतकर्यांच्या शेतीला पाणीपुरवठा करणार्या पाइपलाइन आहेत. त्यामुळे स्थानिकांच्या आरोग्यासह तळयाच्या लाभक्षेत्रातील शेतीपिकांना धोका निर्माण झाला आहे.

याबाबतची माहिती समजताच आरोग्य विभाग व पोलिस प्रशासनाने या ठिकाणी दाखल होत पाहणी केली. तसेच पाण्याचे नमुने घेत ते तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवले. नागरिकांनी पुढील काही दिवस कोंढापुरी तलावातील पाणी शेती, जनावरांना किंवा पिण्यासाठी वापरू नये, असे आवाहन आरोग्य अधिकारी राधिका उत्तम नरगिडे यांनी केले आहे.

# लोणीकंद वाहतूक विभागाअंतर्गत जड वाहनांसाठी वाहतूक बंदीचे अंतिम आदेश जारी

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे शहरातील वाहतूक सुरक्षित व सुरळीत चालण्याच्या अनुषंगाने पुणे शहर वाहतूक शाखेने यापूर्वी लोणीकंद वाहतूक विभागांतर्गत काढलेल्या तात्पुरत्या आदेशांवर प्राप्त हरकती व सूचनांचा विचार करुन अंतिम आदेश जारी केले आहेत.

पुणे शहरातील पुणे नगर रस्त्यावर वाघेश्वर चौक, वाघोली ते खराडी बायपास, केसनंद रस्त्यावर वाघोली ते शिवाजी चौक केसनंद गाव, लोहगाव वाघोली रस्त्यावर लोहगाव चौक, वाघोली ते लोहगाव ते धानोरी मार्गे विश्रांतवाडी व पुणे नगर रस्त्यावर वाघेश्वर चौक, वाघोली ते लाणीकंद दरम्यान सकाळी ७ ते १० व सायंकाळी ५ ते रात्री ९ पर्यंत तसेच लोहगाव रस्त्यावर लोहगाव पेट्रोलसाठा चौक ते विश्रांतवाडीदरम्यान सकाळी ८ ते रात्री ११ वाजेपर्यंत सर्व प्रकारच्या जड, अवजड, मंदगती (डंपर, आर.एम.सी. मिक्सर, जी.सी.बी., रोड रोलर व इतर तत्सम वाहने) वाहनांची वाहतूक तसेच पार्किंग करण्यास बंदी घालण्यात आली आहे.

यापूर्वी लोणीकंद वाहतूक विभागांतर्गत काढलेल्या तात्पुरत्या आदेशांवर प्राप्त हरकती व सूचनांचा विचार करुन व अत्यावश्यक सेवेतील वाहने वगळून हे अंतिम आदेश जारी केल्याचे पोलीस उपआयुक्त रोहिदास पवार यांनी कळविले आहे.

# गुलाबी ई-रिक्षासाठी २० टक्के अनुदान



**पुणे । प्रतिनिधी**

महिलांना रोजगार मिळून स्वतःच्या पायावर उभे राहता यावे, याकरिता शासनाकडून गुलाबी ई-रिक्षा खरेदीवर २० टक्के अनुदान मिळणार आहे. पुण्यात जवळपास १४००, पिंपरी ३००, चिंचवडमध्ये ३०० अशा एकूण २ हजार महिलांना गुलाबी ई-रिक्षा खरेदीसाठी अनुदान देण्याचे निश्चित करण्यात आले आहे. यामुळे बेरोजगार महिलांना रोजगार उपलब्ध होणार आहे.

२०१६ मध्ये महिलांसाठी गुलाबी रिक्षा म्हणजेच अबोली रिक्षा योजना सुरू झाली.

पुण्यात आतापर्यंत इंधनावरील १४१ रिक्षांची खरेदी झाली, त्याद्वारे प्रवासी सेवा पुरवली जात आहे. २०१६ ते २०२४ या नऊ वर्षांच्या कालावधीत या गुलाबी रिक्षाला म्हणावा तसा प्रतिसाद मिळालेला नाही. मात्र, शासनाकडून जाहीर केलेल्या या अनुदानामुळे (सबसिडी) आगामी काळात पुण्यात गुलाबी रिक्षांची संख्या नक्कीच वाढेल, अन् तिही ईलेक्ट्रिकवरीलच, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# वादग्रस्त आयएएस अधिकारी पूजा खेडकरांना निरोपाचा नारळ मिळणार? दिल्लीत हालचालींना वेग

**पुणे । प्रतिनिधी**

खासगी गाडीवर लाल दिवा आणि जिल्हाधिकाऱ्यांच्या अँटी चेंबरवर कब्जा...जिल्हाधिकाऱ्यांपेक्षा जास्त रुबाब करणाऱ्या प्रोबेशनरी आयएएस अधिकारी पूजा खेडकर (झेक्षर घहशवज्ञरी) यांचे नवनवे कारनामे समोर येत आहेत. त्यांच्या या कारनाम्यांची चर्चा पुण्यातील गल्ल्यांपासून दिल्लीपर्यंत होत आहे. अखेर चर्चानंतर पूजा खेडकर प्रकरणी काल एक सदस्य समिती स्थापन करण्यात आली आहे. जर या समितीच्या तपासात खेडकर दोषी आढळून आल्या तर पूजा खेडकर यांची गच्छंती अटळ असल्याची माहिती केंद्र सरकारच्या सूत्रांनी दिली आहे.

डॉ. पूजा खेडकर या २०२३ च्या आयएएस बॅचच्या अधिकारी आहेत. अजून त्यांच्या कारकीर्दीला नीट सुरुवातही झाली नाही पण अवघ्या काही महिन्यांतच त्या चर्चेचा विषय बनल्या. प्रोबेशनवर रुजू होण्याआधीच पूजा खेडकरांच्या डोक्यात पदाची हवा गेली होती. रुजू होण्यापूर्वीच स्वतंत्र केबिन, कार, शिपाई आणि निवासस्थानाची मागणी केली. निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यालयात बसण्याची



सूचना फेटाळली. अप्प्पर जिल्हाधिकारी अजय मोरे यांच्याच केबिनचा जबरदस्तीनं ताबा मिळवला. स्वतःच्या खासगी ऑडी कारवर सरकारी वाहनांवरचा लाल दिवा लावत होत्या. प्रोबेशनवर असलेल्या अधिकाऱ्याला हे सगळं मिळणं नियमबाह्य असतानाही त्यांनी वडिलांच्या मदतीनं ते सगळं मिळवण्याचा प्रयत्न केला आणि अखेर त्यांची बदली वाशिममध्ये करण्यात आली.

पूजा खेडकरांवर फौजदारी कारवाई होणार

पुण्यात प्रोबेशनवर असताना केलेल्या प्रतापानंतर पूजा खेडकर प्रकरणी काल एस सदस्यीय समिती स्थापन करण्यात आली आहे. स्थापन करण्यात आलेल्या एक सदस्यीय समितीच्या तपासात खेडकर दोषी आढळून आल्यास पूजा खेडकर यांना आयएएस पदावर रुजू होऊ दिले जाणार नाही. तसेच खेडकर यांच्यावर फौजदारी कारवाई देखील केली जाणार असल्याची माहिती केंद्र सरकारच्या वरिष्ठ सूत्रांनी दिली आहे. कार्मिक आणि प्रशिक्षण विभाग करणार कारवाई आहे.

खोट्या सर्टिफिकेटवर पूजा खेडकर आयएएस

२०१९ ला सर्वसाधारण उमेदवार म्हणून परीक्षा देणाऱ्या पूजा खेडेकर यु पी एस सी ची परीक्षा उत्तीर्ण तर झाल्या मात्र त्यांना कमी मार्क्स असल्यामुळं आय ए एस चा दर्जा मिळू शकला नाही . मग २०२२ ला पूजा यांनी त्यासाठी शक्कल लढवायचं ठरवलं . आपण फिजिकली डिसेबल म्हणजे शारीरिक दृष्ट्या अपंग आहोत असा दावा करत तस सर्टिफिकेट त्यांनी यु पी एस सी ला सादर केलं . द पर्सन विथ बेंच मार्क डिसेंबलीटीज हा एक वेगळी क्याट्यागरी यु पी एस सी ची परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यंसाठी उपलब्ध आहे . ज्यामध्ये शारीरिक अपंगत्व किती प्रमाणात आहे यावरून १, २, ३, ४ आणि पाच असे प्रकार ठरवण्यात आलेत . पूजा खेडकर यांनी यातील सर्वात खालची म्हणजे टाईप पाचची डिसेबलीटी त्यांना असल्याचा दावा केला . त्यासाठी त्यांना दृष्टिदोष आणि मेंटल इलनेस असल्याचं सर्टिफिकेट त्यांनी सादर केलं . यामुळं यु पी एस सी परीक्षेत ८२१ क्रमांकाची रँक मिळूनही त्यांना आय ए एस चा दर्जा मिळाला . त्यावर्षी यु पी एस सी च्या यादीत ओ बी सी क्याटेगिरीतून आय ए एस झालेल्या शेवटच्या विद्यार्थ्यांची ४३४ रँक होती . म्हणजे जवळपास दुपटीने मागे असूनही पूजा खेडकर आय ए एस बनण्यात यशस्वी झाल्या.

# ज्येष्ठ स्त्रीवादी लेखिका विद्युत भागवत काळाच्या पडद्याआड, ७७ व्या वर्षी घेतला अखेरचा श्वास

**पुणे । प्रतिनिधी**

ज्येष्ठ स्त्रीवादी लेखिका आणि महाराष्ट्रातील स्त्री चळवळीच्या अग्रणी कार्यकर्त्या डॉ. प्रा. विद्युत भागवत (तळर्वीी इहरसुरीं) यांचे गुरुवारी रात्री निधन झालं. त्या ७७ वर्षांच्या होत्या. हृदयविकाराने त्यांचं निधन झालं असून शनिवारी त्यांच्यावर पार्थिववर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. विद्युत भागवत यांच्या मागे एक मुलगी, नातवंडे असा परिवार आहे.

विद्युत भागवत यांनी जवळपास तीन दशके स्त्री चळवळीत काम केलं असून देशातील सामाजिक परिस्थितीवर त्यांनी अनेक लेख आणि पुस्तकेही लिहिली आहेत. प्रसिद्ध लेखक आणि फास्टर फेणे फेम भा. रा. भागवत यांच्या त्या सून होत्या. विद्युत भागवत या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले महिला अध्ययन केंद्राच्या संस्थापक संचालिका होत्या.

विद्युत भागवत यांनी राज्यातील महिला, विद्यार्थी, दलित आणि शेतकर्यांच्या प्रश्नावर आवाज उठवला. महिलांविषयक अभ्यासाला स्वतंत्र अभ्यास शाखा म्हणून घडविणाऱ्या विचारवंतांच्या यादीत त्यांचा समावेश होतो. त्यांचे स्त्रियांच्या प्रश्नांवरील लिखाण, स्त्रीवादी सिद्धांत आणि सामाजिक इतिहासावरील लिखाण गाजले.

शैक्षणिक लेखनाव्यतिरीक्त त्यांनी मराठी आणि इंग्रजी वृत्तपत्रांतही लिखान केलं. कथा, कविता आणि कादंबरीलेखनासाठी त्या ओळखल्या जायच्या. विविध भारतीय भाषांमधील लेखिकांचे साहित्य एकत्र आणणाऱ्या 'विमेन्स रायटिंग इन इंडिया' या प्रकल्पाच्या त्या संपादक होत्या.